१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, गुरुवार ११ डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-८३, पाने-८, किंमत : ₹ ६
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 83, Marathi - Daily - Pune, 11 December, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
यवतमाळमधील शाळेत जातीवाद?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# पुन्हा नोटांच्या थैल्या! दुसरा व्हिडिओ! आता गोगावले!

# देशपांडेंचाही बांधकाम खात्याच्या लाचखोरीचा नवा व्हिडिओ

**मुंबई - महाराष्ट्रात काल कॅश बॉम्ब व्हिडिओने खळबळ उडवल्यानंतर भ्रष्टाचाराचे आणखी दोन नवे धक्कादायक व्हिडिओ आज व्हायरल झाले. काल उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी रायगडमधील शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांचा नोटांच्या पुडक्यांसहचा व्हिडिओ जारी केल्यानंतर आज शेकापच्या नेत्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी रायगडचेच आणि पुन्हा शिंदे सेनेचेच मंत्री भरत गोगावले यांचा नोटांच्या बंडलासह व्हिडिओ दाखवून त्यांच्यावर गंभीर आरोप केले. त्याबरोबर मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी सार्वजनिक बांधकाम खात्यातील उघड लाचखोरीचा दुसरा व्हिडिओ आज जारी केला. या भ्रष्टाचाराची चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी दोघांनीही केली. मात्र काल व्हिडिओ बॉम्बनंतर जशी सर्वपक्षीय शांतता होती तशीच आजही होती. जनता मात्र भ्रष्टाचाराचे हे व्हिडिओ पाहून थक्क झाली आहे.**

## साहेबांना २५ टक्के द्यावे लागतात

## संदीप देशपांडे यांचा दुसरा व्हिडिओ

**मनसेचे** नेते संदीप देशपांडे यांनी काल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरळीतील (पीडब्ल्यूडी) एका अभियंत्याच्या भ्रष्टाचाराचा व्हिडिओ प्रसिद्ध केला होता. आज त्यांनी कुर्ला विभागातील अधिकारी कंत्राटदाराकडून पैसे स्वीकारून ते खिशात ठेवतानाचा नवा व्हिडिओ जारी केला. त्यानंतर संदीप देशपांडे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत या खात्याची खालपासून वरपर्यंत चौकशी करण्याची मागणी केली.

या व्हिडिओत पैसे घेणारा अधिकारी आणि कंत्राटदाराचे सविस्तर संभाषण आहे. संदीप देशपांडे यांनी आरोप केला की, आजचा व्हिडिओ कुर्ला विभागामधील एका उपअभियंत्याचा आहे. तो पूर्ण व्हिडिओ बघितला आणि त्यातील संभाषण ऐकले तर लक्षात येईल की त्यात अनेक अधिकाऱ्यांची नावे घेतली आहेत. त्यात एका जिल्हा विकास फंडाचा उल्लेख आहे. व्हिडिओत अधिकारी सांगतो की, हा फंड मिळवण्यासाठी काळे नावाच्या व्यक्तीला लाच द्यावी लागते. कंत्राटदार म्हणतो की आता त्याला मराठे रावसाहेबांचा हिशेब करायचा आहे आणि त्यांनाही पैसे द्यावे लागतील. त्यात आणखी कोणतरी साहेब असा उल्लेख होतो, ते कोण आहेत माहीत नाहीत. परंतु त्यांची चौकशी करणे आवश्यक आहे. त्या साहेबांना २५ टक्के द्यायला लागतात. त्यानंतर तो अधिकारी म्हणतो की, मी तुम्हाला एकूण १ कोटी २० लाख




पान ७ वर

## नोटांसह गोगावले! ईडी लावा

## चित्रलेखा पाटील यांची मागणी

**शिवसेना** शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांचा नोटांच्या पुडक्यांसहचा व्हिडिओ उबाठाचे अंबादास दानवे यांनी काल प्रसिद्ध केल्यानंतर आज शिवसेनेचेच रायगडमधीलच मंत्री भरत गोगावले यांचा नोटांच्या बंडलासोबतचा व्हिडिओ शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनी प्रसिद्ध केला. त्यामुळे अधिवेशनाच्या काळात शिंदे गटावर दुसरा बॉम्ब पडला आहे. चित्रलेखा पाटील या शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्या सून आहेत.



चित्रलेखा पाटील यांनी आपल्या मोबाईलमध्ये दाखवलेल्या व्हिडिओत उघड्या बॅगांमध्ये ठेवलेल्या नोटांच्या बंडलांसह मंत्री भरत गोगावले दिसत आहेत. हा व्हिडिओ दाखवून त्यांनी केंद्र आणि राज्य शासनाने सीबीआय, ईडी आणि अँटी करप्शन ब्युरोकडून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, हा व्हिडिओ माझ्याकडे आला, तो मी दाखवला. तो खरा आहे की खोटा याची चौकशी करावी अशी माझी मागणी आहे. गोगावले आणि महेंद्र दळवी हे चीटर आमदार आहेत. ते जनतेची कशी फसवणूक करतात, हे

पान ७ वर

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित
मुंबै बँक
गोल्ड लोन
फक्त ₹24/- प्रतिदिन व्याजदर ₹ 1,00,000/- लाखावर
संपर्क - 8976754277/8976754289

### सिन्नरचे नायब तहसीलदार लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

**नाशिक -** जमिनीचा अनुकूल निकाल लावून देण्याच्या बदल्यात अडीच लाख रुपयांची लाच स्वीकारताना सिन्नरचे नायब तहसीलदार संजय धनगर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात अडकले. तक्रारदाराकडे सिन्नरच्या नायब तहसीलदारांनी सुरुवातीला दहा लाख रुपयांची मागणी केली होती पण नंतर तडजोडीत ही रक्कम अडीच लाख रुपये इतकी ठरली.

## व्होट चोरीबाबत उत्तर देताना शहांचा गांधी परिवारावर आरोप

■ नवी दिल्ली

**काँग्रेस** नेते राहुल गांधी हे सतत मतदार यादीतील घोळांचा पर्दाफाश करून व्होट चोरी होत असल्याचा आरोप करीत आहेत. याला आज लोकसभेत उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुन्हा एकदा नेहरू आणि गांधी परिवारावरच आरोप केले. यामुळे लोकसभेत प्रचंड गदारोळ झाला.

व्होट चोरीवर उत्तर देताना अमित शहा म्हणाले की, काँग्रेस जिंकते तेथे व्होट चोरी नसते आणि भाजपा जिंकते तेव्हाच व्होट चोरी असते. हे बरोबर नाही. व्होट चोरी नेमकी तीन प्रकारची असते. बहुमत नसताना विजयी होणे, अनैतिक रितीने निवडणूक जिंकणे, योग्यता नसताना मतदार बनने हे ते तीन प्रकार आहेत. याबाबत मी माहिती देतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंतप्रधान कोण होईल, यावर मतदान झाले. तेव्हा सरदार पटेलांना २८ मते मिळाली आणि जवाहरलाल नेहरू यांना केवळ दोनच मते मिळाली. तरीही जवाहरलाल नेहरू हेच पंतप्रधान झाले. या व्होटचोरीला बहुमत नसताना विजयी होणे असे म्हणतात. इंदिरा गांधी या बरेली मतदार संघातून विजयी झाल्या. या विजयाच्या विरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली. न्यायालयाने

पान ७ वर

## शशी थरूर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार नाकारला

■ नवी दिल्ली

**गेल्या** काही दिवसांपासून भाजपाशी जवळीक वाढलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार शशी थरूर यांनी एचआरडीएस या स्वयंसेवी संस्थेने जाहीर केलेला वीर सावरकर इंटरनॅशनल इम्पॅक्ट अ‍ॅवार्ड-२०२५ स्वीकारण्यास नकार दिला.आपल्याला न विचारताच पुरस्काराची घोषणा केल्याबद्दल थरूर यांनी नाराजी व्यक्त केली. ऑपरेशन सिंदूरबद्दल परदेशांत माहिती देण्यासाठी केंद्र सरकारने पाठवलेल्या प्रतिनिधी मंडळात काँग्रेसकडून थरूर सहभागी झाले होते. प्रतिनिधी मंडळांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑपरेशन सिंदूरमागील पार्श्वभूमी समजावून सांगितली. त्यामुळे संस्थेने थरूर यांना हा पुरस्कार घोषित केला होता. मात्र अशाप्रकारे संस्थेने आपली पूर्व सहमती न घेता परस्पर निर्णय घेणे थरूर यांना रुचले नाही. त्यामुळे त्यांनी पुरस्कार स्वीकारण्यास नकार दिला.

## बिबटे वस्तीत नको असतील तर बकरे जंगलात पाठवा! वनमंत्री

■ नागपूर

**सध्या** राज्यात अनेक ठिकाणी भक्ष्याच्या शोधात मानवी वस्तीत शिरणाऱ्या बिबट्यांची प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी अनेक उपाययोजनांवर वन विभाग विचार करत आहे. या पार्श्वभूमीवर वनमंत्री गणेश नाईक यांनी वन विभागाला एक अजब उपाय सुचवला. बिबटे मानवी वस्तीत नको असतील तर जंगलांमध्ये बकऱ्या नेऊन सोडा, असा सल्ला गणेश नाईक यांनी दिला.

बिबट्यांकडून माणसांवर होणाऱ्या हल्ल्यांचे प्रमाण राज्यात खूप वाढले असून



त्यावर सरकार काय उपाय योजना करत आहे, असा सवाल राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत लक्ष्यवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना वनमंत्री नाईक म्हणाले की, बिबट्यांच्या हल्ल्यांत जर चार माणसे ठार झाली तर सरकारला नुकसान भरपाईपोटी एक कोटी रुपये द्यावे लागतात. त्यामुळे मी वन विभागाला सांगितले की माणसे मारली गेल्यावर नुकसान भरपाई देण्यापेक्षा एक कोटी रुपयांच्या बकऱ्या विकत घेऊन त्यांना जंगलात सोडून द्या.

## मुंढवा प्रकरणात पार्थ पवारांवर गुन्हा का नाही? हायकोर्टाचा सवाल

■ मुंबई

**पुण्यातील** मुंढवा-कोरेगाव पार्क परिसरातील जमीन गैरव्यवहार प्रकरणात अटक आणि चौकशी सुरू असताना, मुंबई उच्च न्यायालयाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या भूमिकेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. दाखल पोलीस तक्रारीमध्ये पार्थ पवार यांचे नाव का नाही, असा थेट सवाल उच्च न्यायालयाने पोलिसांना केला.

बावधन पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यांमधून उद्भवलेल्या आरोपी शीतल तेजवानीच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती माधव जामदार यांनी हा मुद्दा अधोरेखित केला. अमेडिया कंपनीतील भागीदार दिग्विजय पाटीलवर गुन्हा दाखल असताना, त्याच कंपनीशी संबंधित पार्थ पवार यांच्यावर कारवाई का नाही? याची विचारणा न्यायालयाने केली. या प्रश्नावर तपास सुरू असल्याचे पोलिसांनी उत्तर दिले. पोलिसांच्या अशा उत्तरामुळे न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

उच्च न्यायालयाच्या थेट प्रश्नामुळे आता तपासाची दिशा बदलणार का? आणि पार्थ पवारांवर कारवाई होते का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संसद अधिवेशन सुरू असताना रवा. राहुल गांधी जर्मनी दौऱ्यावर

■ नवी दिल्ली

**संसद** अधिवेशन सुरू असताना देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी १५ ते २० डिसेंबरदरम्यान जर्मनीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते तिथला भारतीय समुदाय आणि जर्मन सरकारच्या मंत्र्यांना भेटणार आहेत. त्यांच्या या विदेश दौऱ्यावर भाजपाने त्यांना विदेश नायक संबोधत त्यांच्यावर सडकून टीका केली.

१ ते १९ डिसेंबर या कालावधीत संसद अधिवेशन सुरू आहे. मात्र यादरम्यानच लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी मात्र जर्मनी



दौऱ्यावर जाणार आहेत. हा कार्यक्रम इंडियन ओव्हरसीज काँग्रेसने आयोजित केला आहे. या संस्थेचे सरचिटणीस विक्रम दुहान यांनी सांगितले की, भारताच्या जागतिक भूमिकेवर चर्चा करणे, जर्मन नेत्यांशी विचारांची देवाणघेवाण करणे आणि अनिवासी भारतीय समुदायाशी काँग्रेस पक्षाचे संबंध मजबूत करणे हा या भेटीचा उद्देश आहे. या दौऱ्यात त्यांच्यासोबत इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष सॅम पित्रोदा असणार आहे.

भाजपा प्रवक्ते शहजाद यांनी एक्सवर लिहिले की, पुन्हा एकदा विदेश नायक परदेश दौऱ्यावर जाणार आहे. संसद १९ डिसेंबरपर्यंत सुरू आहे. पण राहुल गांधी १५-२० डिसेंबर दरम्यान जर्मनीला भेट देणार आहेत.

## ७० ट्रकने १५ हजार झाडे नाशिकला आणणार! गिरीश महाजनांची माहिती

■ नागपूर

**नाशिकच्या** तपोवनमधील वृक्षतोडीला सर्व थरांमधून कडाडून विरोध होत असताना वृक्षतोडीच्या निर्णयावर कायम राहत कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी आज ७० ट्रकने १५ हजार झाडे नाशिकला पोहचणार असल्याची माहिती दिली.

याप्रसंगी महाजन म्हणाले की, आम्ही वारंवार सांगितले आहे की, शासन कोणतेही अनावश्यक झाड तोडणार नाही. मागील ८-१० वर्षात जी झाडे झुडपे उगवली आहेत ती मुळासकट उपटून त्यांचे दुसरीकडे पुनर्रोपण करणार आहोत. त्याव्यतिरिक्त १५-२० फुटांची १५ हजार झाडे ७० ट्रकच्या माध्यमातून नाशिकमध्ये येणार आहेत. त्यासाठी खड्डे खोदकाम आणि इतर नियोजन झाले आहे.

आम्ही जे १२०० झाडे काढू त्यातील किमान ३००-४०० झाडे मरू शकतात. परंतु बाकी सर्व झाडे आम्ही पुन्हा लावणार आहोत. या सर्व गोष्टींची तज्ज्ञांनी पाहणी केली आहे. वृक्षतोड न करणे, पर्यावरणाचा समतोल राखणे हीच सरकारची भूमिका आहे. परंतु कुंभमेळा देखील महत्वाचा आहे. दरम्यान, वृक्षतोडीविरोधात पर्यावरण प्रेमींनी आंदोलन केलेले आहे.

**तिरुमला तिरुपती देवस्थानात लाडू भेसळ प्रकरणानंतर आता रेशीम दुपट्ट्यांचा मोठा घोटाळा उघड झाला आहे. यात तब्बल ५४ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती आहे. २०१५ ते २०२५ या दहा वर्षांच्या काळात तिरुपती देवस्थानात ट्रस्टीने मोठ्या प्रमाणात दुपट्टे खरेदी केले होते. प्रत्येक दुपट्ट्याचा दर १,३८९ रुपये असून ते १०० टक्के शुद्ध रेशीमचे असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र तपासणीसाठी हे नमुने सेंट्रल सिल्क बोर्ड, मैसूर येथे पाठवले असता ते दुपट्टे शुद्ध रेशीम नसून पॉलिस्टरचे असल्याचे स्पष्ट झाले.**

## तिरूपती देवस्थानचा घोटाळा रेशीम ऐवजी पॉलिस्टर दुपट्टा

■ तिरुवनंतपुरम

**देणगीदार** व व्हीआयपी दर्शन घेणाऱ्या भक्तांना दररोज दिल्या जाणाऱ्या या दुपट्ट्यांची गुणवत्ता तपासण्याचे आदेश



ट्रस्टचे अध्यक्ष बी.आर. नायडू यांनी गुप्तचर आणि सुरक्षा विभागाला दिले होते. तपास पथकाने नमुने बंगळुरु आणि धर्मावरम येथील प्रयोगशाळेत तपासले असता पॉलिस्टरचे असल्याची पुष्टी झाली. हे दुपट्टे गेली अनेक वर्षे एकाच कंपनीकडून पुरवले जात होते. त्यांनी तब्बल १५,००० दुपट्ट्यांचा पुरवठा केला होता. मंदिरात वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक वस्तू शंभर टक्के शुद्ध असणे बंधनकारक असतानाही या प्रकरणात सरळसरळ फसवणूक झाल्याचे नमूद केले आहे. घोटाळा समोर आल्यानंतर तिरुपती देवस्थानात ट्रस्टीने तातडीने तपास सुरू केला. सर्व कागदपत्रे, बिले आणि नमुने जप्त करण्यात आले आहेत. हे प्रकरण आता राज्य लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सुपूर्द करण्यात आले.

## ईव्ही सक्तीच्या निर्णयाला बाईक टॅक्सी संघटनेचा विरोध

■ मुंबई

**राज्य** सरकारने फक्त विजेवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक बाईकनाच बाईक टॅक्सी म्हणून परवानगी देण्याचा निर्णय नुकताच घेतला असून त्याचा शासन निर्णयही (जीआर) लागू केला आहे. या निर्णयाला बाईक टॅक्सी असोसिएशनने (बीटीए) कडाडून विरोध केला आहे.सरकारच्या या निर्णयाने एका फटक्यात हजारो बाईक टॅक्सी चालक बेरोजगार झाले, असे असोसिएशनचे म्हणणे आहे.

बीटीएचे असे म्हणणे आहे की, सरकारने हा निर्णय एकदम घाईघाईत घेतला आहे. आमचा इलेक्ट्रिक वाहनांना विरोध नाही. परंतु सध्या ज्या पेट्रोलवर चालणाऱ्या दुचाकी बाईक टॅक्सी म्हणून चालवल्या जात




आहेत त्यांचे इलेक्ट्रिक दुचाकीमध्ये रुपांतर करण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. तसेच आर्थिक मदत आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक

पान ७ वर

## काँग्रेसची आसनव्यवस्थेबाबत तक्रार उबाठा आमदारांना पुढे जागा का?

■ नागपूर

**महाराष्ट्र** विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी आसन व्यवस्थेवरून ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये वाद निर्माण झाला. सभागृहातील पुढच्या रांगेत बसण्याच्या जागांवर मतभेद निर्माण झाल्याने काँग्रेस आमदारांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेऊन आपली तक्रार मांडली. सभागृहात उबाठाच्या २० आमदारांपैकी १४ आमदारांना पुढच्या रांगेत बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याउलट, काँग्रेसच्या १६ आमदारांपैकी फक्त ४ आमदारांना पुढच्या रांगेत जागा दिली आहे. त्यामुळे काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदारांना ठाकरे गटाच्या नवीन आणि कनिष्ठ आमदारांच्या मागे बसावे लागत होते. सदस्यांच्या मते संख्याबळ आणि परंपरेनुसार दोन्ही पक्षांनी पुढच्या जागांवर दावा केला होता. अखेर काँग्रेसने आपली मागणी स्पष्ट मांडल्यानंतर उबाठाच्या पुढच्या रांगेतील दोन जागा कमी करून काँग्रेसला देण्यात आल्या. त्यामुळे उबाठात नाराजी आहे.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (24,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC253224}

मुंबईत घरकाम, कूक, मुलांची काळजी, रुग्णसेवा, यासाठी मुली/महिला पाहिजे. मोफत राहणे-खाणेची व्यवस्था, पूर्णवेळ/अर्धवेळ, चांगला पगार. **9819339480** {NC253233}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC253328}

नेरुळ जिमसाठी जवळपासचे Staff receiptionist पाहिजे. **9594503777** {NC253329}

मालाड, गोरेगावसाठी डिलिव्हरीबॉईज (बाईकर्स/ नॉन बाईकर्स) पाहिजेत. पगार 20,000/- ते 30,000/- संपर्क- **9920907526** {NC253344}

कांदिवली महावीर नगरसाठी सिक्युरिटी गार्ड्स आणि सुपरवायझर पाहिजेत. 12 तास ड्युटी, पगार 16000/-. संपर्क: अमर जवान सिक्युरिटी- **7028374768.** {NC253351}

हिंडलबर्ग ऑफसेट (MOV) मशीनवर फिडरमन पाहिजे आहे कोल्हापूर **9423042344, 9420493001** {NC253322}

घरबसल्या बडीशेप, धनाडाळ, मुखवास पॅकिंग काम हप्ता 12000. मो.- **8097099007** {NC253370}

इमीटेशन ज्वेलरीच्या कामासाठी महिला पाहिजेत. (वेळ 9-7) मालाड (वेस्ट) पगार-11,000/- अर्जुन : **9820002662** {NC253371}

## पाहिजेत

ड्रायव्हर पाहिजेत. कॉलसेंटर, ओला, उबर, एअरपोर्टसाठी. मुंबई, ठाणे, नवी मुंबई. उत्तम पगार+ इन्सेंटिव. संपर्क: **9136792068** {NC253372}

बोरिवली पश्चिम येथील नामांकित कंपनीत ऑफिस बॉय त्वरित पाहिजेत. (वय 50 पर्यंत) राहणार- भाईंदर ते अंधेरी, वेळ १२ ते ६, ऑफिस नं. 12, अनुराधा अनुजा बिल्डिंग, मानेकनगर, चंदावरकर रोड, बोरिवली पश्चिम. संपर्क: **7021564823** {NC253373}

मिठीबाई कॉलेज विलेपार्ले येथे हाउसकिपिंग सुपरवायझर, प्यून त्वरीत पाहिजेत. पत्ता:- ४१४, ई-विंग, ४ था माळा, झी-शान, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व). **9326007480 / 8850492045/ 9820426010** {NC253374}

ऑफिसबॉय मुलुंड येथे पाहिजे. वय : ३० वर्षा खालील, पगार- 10,000/- संपर्क: 7045663298 {NC253375}

## Situation Vacant

Wanted Courier Boys at Khar. Apply with biodata. Call: **9930011100** {NC253326}

## व्यवसायविषयक

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30-35 हजार कमवा दोन वर्षाचे अग्रीमेंट - **9028160157** {NC253323}

## व्यसनमुक्ती

दारू सोडवा दारू, तंबाखू, गुटखा सिगारेट औषधे उपलब्ध. डॉ. नागरगोजे- **9765609769** {NC253376}


# आजचे राशी भविष्य

गुरुवार दि. ११ डिसेंबर २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कामाचा ताण दूर होईल. मानसिक समाधान लाभेल. अचानक धनलाभाचे योग. प्रवास घडू शकतो. |
| वृषभ | घरासंबंधित कामांमध्ये सफलता मिळेल. खर्चाचे प्रमाण वाढेल. नवीन खरेदी करताना फसवणूक होऊ शकते. |
| मिथुन | कामानिमित्त छोटा प्रवास लाभदायक ठरेल. चैनीच्या गोष्टी खरेदी करण्याकडे कल राहील. भावंडांचे सौख्य लाभेल. |
| कर्क | कार्यक्षेत्रात जिद्दीने यश मिळवाल. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नोकरीनिमित्त दूरचा प्रवास घडेल. नोकरीत तुमचे वर्चस्व राहील. |
| सिंह | व्यवसायामध्ये आर्थिक उलाढाल करण्याचे योजाल. अनेक अडचणींवर मात कराल. प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यात यश मिळेल. |
| कन्या | कार्यक्षेत्रात अचानक काही अडचणी येऊ शकतात. प्रवासामध्ये अधिक खर्च होऊ शकतो. नवीन करार करताना कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक. |
| तूळ | कार्यक्षेत्रात आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नवीन आर्थिक गुंतवणूक करण्याचे योजाल. प्रेमात सफलता मिळेल. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात अधिक जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. बोलण्यावर नियंत्रण आवश्यक. वडिलधाऱ्यांची काळजी घ्यावी लागेल. |
| धनु | सरकारी कामांमध्ये कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अधिक वेळ द्यावा लागेल. स्वतःवर जाणीवपूर्वक संयम ठेवणे गरजेचे. |
| मकर | कार्यक्षेत्रात काही अडचणींना सामोरे जावे लागेल. आर्थिक स्थित्यंतरे जाणवतील. प्रवासात आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. |
| कुंभ | कार्यक्षेत्रात जिद्दीने यश मिळवाल. मोठ्या लोकांच्या संपर्कात वाढ होईल. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. |
| मीन | कार्यक्षेत्रात उत्साहाने कार्यरत राहाल. नोकरीमध्ये तुमच्या कौशल्याचे कौतुक होईल. कामानिमित्त प्रवास फायदेशीर ठरतील. |

## मुरबाड-कल्याण मार्गावर अपुऱ्या बस फेऱ्यांमुळे कुचंबणा

■ मुरबाड

**मुरबाड-कल्याण** मार्गावर पुरेशा बस फेऱ्या होत नसल्याने प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत आहे. ग्रामीण भागातील अनेक प्रवाशांची यामुळे कुचंबणा होत आहे.

मुरबाड- कल्याण मार्गावर प्रवाशांची संख्या मोठी आहे.मात्र या मार्गावर दिवसातून फक्त एक-दोन बसच जातात.मुरबाड येथून पहाटे ९ ते १० बसेस विठ्ठलवाडी वा कल्याणकडे जात असल्या तरी त्या लांब पल्ल्याच्या असतात त्यामुळे त्याचा मुरबाडच्या प्रवाशांना काहीही फायदा होत नाही. शिवाय रात्री उशिरा या बसेस मुरबाडला परतत असल्याने दिवसभर कल्याण-मुरबाडच्या प्रवाशांना दुसरा पर्याय नसतो. मुरबाड स्थानकाबाहेरूनच खाजगी वाहनाने प्रवाशांची वाहतूक होते तरी मुरबाड आगाराचे याकडे दुर्लक्ष का, असा सवाल प्रवासी करत आहेत.

## विमानाचे तिकिट दर का वाढले? हायकोर्टाचा केंद्राला सवाल

■ नवी दिल्ली

**इंडिगो** विमान उड्डाणांच्या रखडपट्टीनंतर दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडे अन्य कंपन्यांच्या तिकिटांची किंमत ३५ ते ३९ हजारपर्यंत कशी पोचली , अशी विचारणा आज केली. तसेच अचानक ओढवलेल्या या समस्येमुळे प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी काय उपाययोजना केल्या, इंडिगोच्या गोंधळाचा फायदा उठवण्याची संधी अन्य विमान कंपन्यांना का दिली गेली आणि तिकिटांचे अव्वाच्या सव्वा दर आकारले कसे? अशी एकापाठोपाठ एक प्रश्नांची सरबत्ती न्यायालयाने केली. यावेळी सरकारी बाजूकडून, संबंधित कंपन्यांना करणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांनी दिलगिरी व्यक्त केल्याचे सांगण्यात आले.


**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

- **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# टीम इंडियाचा खेळाडू

# करुण नायर

**करुण नायरचा जन्म जरी जोधपूर येथे झाला पण पुढे त्याचे कुटुंब कर्नाटकात गेले. तो कर्नाटककडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो. करुण बंगळुरुच्या चिन्मयी शाळेत होता. तिथे सराव करत असताना शशीधर या दुसऱ्या शाळेच्या क्रिकेट प्रशिक्षकांनी त्याला पाहिले. त्याच्या चिन्मयी शाळेचा क्रिकेटचा संघ नव्हता. तर दुसरीकडे करुणची फलंदाजी पाहून त्याची गुणवत्ता वाऱ्यावर सोडावी असे त्यांना वाटले नाही. त्यांनी आपण प्रशिक्षण देत असलेल्या फँक अँथोनी शाळेच्या मुख्याध्यापकांना ही गोष्ट सांगितली. ते एक दिवस त्याचा खेळ पाहायला शशीधरन यांच्याबरोबर आले. करुण त्यावेळी फक्त चौथीत शिकत होता. त्यांनी खेळतानाचे त्याचे सरळ बॅटने मारलेले फटके पाहिले. एवढ्या लहान वयात खेळ नेमका काय आहे, हे जेव्हा मुलांना माहिती नसते त्या वयात करुण सरळ बॅटने खेळत होता. त्याची फलंदाजी मुख्याध्यापकांना आवडली, त्यांनी शाळेत प्रवेशाची परवानगी दिली. त्यानंतर शशीधरन यांनी करुणच्या पालकांना याबाबत माहिती दिली. त्यांनीही होकार दिला आणि करुणचे क्रिकेट योग्य मार्गावर आले.**



करुण पहिल्यापासूनच शांत आणि हुशार होता. त्याला कधी कसा खेळ करायचा हे सांगावे लागले नाही. त्याच्या या वयात मनगटात ताकद नसतानाही मुलं मोठा फटका मारायला जायची, त्यावेळी करुण एक धावा काढून समोरच्याला फलंदाजी देण्याचा विचार करत होता. करुणमध्ये कमालीची शिस्तही होती. त्यावेळी सकाळी आणि संध्याकाळी प्रत्येकी दोन तासांच्या सरावाला तो हजर असायचा. सरावाला कधीही दांडी मारत नसायचा. शाळेत सराव नसायचा तेव्हा घराजवळच्या क्रिकेट क्लबमध्ये जाऊन तो अन्य खेळाडूंचा खेळ बघत बसायचा. न खेळता खेळाचा अभ्यास करण्याचे तंत्र त्याला त्यावेळीच अवगत होते. त्याच्या फलंदाजीत कमालीचे सातत्यही होते. सातत्याने धावा जमवण्याचे कसबही त्याला माहिती होतेच.



२००७ साली हिमालय चषकातल्या उपांत्यपूर्व फेरीत त्याचा संघ अडचणीत होता. त्यावेळी करुणने १८८ धावांची खेळी साकारली होती. त्यावेळीच भविष्यात हा भारतासाठी खेळेल, असे शशीधरन यांना वाटले होते. चेन्नईच्या पाचव्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशीही करुण आणि शशीधरन यांच्यामध्ये बोलणे झाले. तेव्हा करुण ७१ धावांवर खेळत होता. त्यावेळी शशीधरन यांनी त्याला द्विशतक पूर्ण करायची संधी असल्याचे सांगितले. करुणने त्रिशतक झळकावत त्यांना धक्काच दिला. शिष्य आणि प्रशिक्षक यांच्यातील हा संवाद एका तपापासून अधिक काळ अविरत सुरू आहे. अजूनही करुण आपल्या खेळीतल्या त्रुटी दूर करण्यासाठी शशीधरन यांच्याशी संवाद साधतो. इराणी चषकाच्या रणजी विजेता मुंबईचा संघ आणि शेष भारतीय संघात सामन्यात करुण शेष भारत संघात होता. या सामन्यात मुंबईने शेष भारतापुढे ३८० धावांचे आव्हान ठेवले होते. फैझ फजल आणि सुदीप चटर्जी हे दोघे खेळपट्टीवर ठाण मांडून होते खरे, पण धावगती तीनच्या वर जात नव्हती. सुदीप बाद झाला. करुण मैदानात आला आणि शांत चित्ताने धावगती वाढवत नेली. जलदगतीने ९२ धावांची खेळी साकारत त्याने संघाला विजयाचा मार्ग दाखवला. यावेळी सामनावीराचा पुरस्कारही त्याने पटकावला. कारण पहिल्या डावातही त्याने संकटमोचकाची भूमिका बजावली होती. मुंबईने प्रथम फलंदाजी करताना सहाशे धावांचा डोंगर उभारला होता. या आव्हानाचा पाठलाग करताना शेष भारतीय संघाची ५ बाद १३२ अशी अवस्था होती. त्यावेळी करुणने ९४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली होती. त्यामुळे शेष भारतीय संघाच्या विजयाचा तो खऱ्या अर्थाने नायक ठरला होता. यापूर्वी रणजी करंडक स्पर्धेतही त्याने छाप पाडली होती. त्याने आतापर्यंत फक्त दोन एकदिवसीय आणि सहा कसोटी सामने खेळले आहेत. त्याने जून २०१६ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तो एकदिवसीय सामना होता. एकदिवसीय सामन्यांनंतर लवकरच, त्याने नोव्हेंबर २०१६ मध्ये इंग्लंडविरुद्ध कसोटी पदार्पण केले. २०१७ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या कसोटी सामन्यात त्रिशतक झळकावल्यामुळे करुण नायर हा क्रिकेटमधला नवा हिरो ठरला होता. वीरेंद्र सेहवागनंतर या भारतीय खेळाडूने त्रिशतक झळकावले होते. त्याचबरोबर त्या वर्षी किंग्ज इलेव्हन पंजाबकडूनही तो खेळला होता. या त्रिशतकानंतर त्याला तीन कसोटी सामने खेळण्याची संधी मिळाली. परंतू त्या तीन सामन्यात तो काही खास करू शकला नाही. २०१७ मध्ये धर्मशाला येथे ऑस्ट्रेलिया विरूद्ध करूणने आपला अंतिम कसोटी सामना खेळला होता. करूणने कर्नाटककडून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५००० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. भारतीय संघाकडून तो सहा कसोटी सामने खेळले आहेत. त्यात त्याने ३७४ धावा केल्या आहेत. तर दोन वनडे सामने खेळले या दोन सामन्यात त्याने ४६ धावा केल्या आहेत.त्याने आत्तापर्यंत ६ कसोटी सामने आणि २ वनडे सामने खेळले आहेत. यात त्याने कसोटीमध्ये ३७४ धावा आणि वनडेत ४६



धावा केल्या आहेत. करूण नायरने जानेवारी २०२० मध्ये शनाया टंकरीवालाशी लग्न केले. करूण नायर आणि शनाया बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत होते. मागच्या वर्षी जूनमध्ये करूण नायरने शनायाला लग्नासाठी मागणी घातली.

## म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार विभागाकडून साहित्य वाहून नेण्यासाठी गाढवांचा वापर

■ मुंबई

**म्हाडा** मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या वतीने केली जाणारी नागरी सुविधांची कामे कंत्राटदारांच्या माध्यमातून केली जातात. काही कंत्राटदार आपल्या कामांचे साहित्य वाहून नेण्यासाठी गाढव या प्राण्याचा सर्रास वापर करत असल्याची माहिती हाती आली आहे.

मुंबईसह उपनगरातील झोपडपट्ट्यातून शासनाच्या जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून गटारे, पायपाटा, लादीकरण, उद्याने, बालवाड्या, समाज मंदिर हॉल व सार्वजनिक शौचालये आदी कामे म्हाडा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडून केली जातात. मात्र अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार उपनगरात अनेक भागात उंच दरडींवर झोपड्या आहेत. तर काही झोपडपट्ट्यांमध्ये चिंचोळ्या पायवाटा आहेत. अशा जागी नागरी कामे करण्यासाठी लागणारे सिमेंट, विटा, दगड, रेती, लोखंड आदी साहित्यांचा भार डोक्यावरून उचलून नेताना मजूर वर्गाची दमछाक होते. दरडींवर साहित्य नेताना तारेवरची कसरत करावी लागते. यावर पर्याय म्हणून गाढवाच्या पाठीवर साहित्यांचे ओझे ठेवून कामाच्या ठिकाणी नेण्याची शक्कल काही कंत्राटदारांनी लढविली आहे. गाढवांच्या मजुरीची किंमत मालकाला अदा केली जाते.

## अमेरिका व्हिसासाठी सोशल मीडिया तपासणी होणार! भारतीयांना चिंता

■ नवी दिल्ली

**अमेरिकेच्या** परराष्ट्र विभागाने अलिकडेच लागू केलेल्या नियमावलीनुसार सर्व एच-१बी व्हिसाधारक आणि एच-४ अवलंबितांनी व्हिसा तपासणीसाठी त्यांचे सोशल मीडिया अकाउंट पूर्णपणे सार्वजनिक करावे लागणार आहे. त्यामुळे अमेरिकेतील बहुसंख्य भारतीयांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. हे धोरण १५ डिसेंबरपासून लागू होणार आहेत.



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एच-१बी व्हिसा नियम अधिक कडक करण्याचे आदेश दिले आहेत. एच-१बी अर्जदारांना त्यांचे सोशल मीडिया अकाउंट सार्वजनिक करावे लागतील जेणेकरून अमेरिकन अधिकारी त्यांचे प्रोफाईल, सोशल मीडिया पोस्ट आणि लाईक्स पाहू शकतील. जर अर्जदाराच्या कोणत्याही सोशल मीडियावर अमेरिकेच्या हिताच्या विरुद्ध पोस्ट, लाईक असल्याचे आढळले तर एच-१बी व्हिसा जारी केला जाणार नाही. एच -४ व्हिसासाठी एच-१बीचे अवलंबितांना (पती-पत्नी, मुले आणि पालक) या सर्वांना सार्वजनिक सोशल मीडिया प्रोफाईल राखणे देखील आवश्यक असेल. एच-१बी व्हिसासाठी सोशल मीडिया प्रोफाईल व्हेरिफिकेशन आवश्यक असण्याची ही पहिलीच वेळ आहे.

नवीन नियम १५ डिसेंबरपासून लागू असे ट्रम्प प्रशासनाने सर्व दूतावासांना निर्देश जारी केले आहे.ऑगस्टपासून, अभ्यास व्हिसा एफ-१, एम-१, जे-१ तसेच अमेरिका फिरायला जाणाऱ्यांसाठीही लागणारे व्हिसा बी-१ बी-२ साठी सोशल मीडिया प्रोफाईल सार्वजनिक करण्याची आवश्यकता लागू करण्यात आली आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 50 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 10/12/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-04 : 2419**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0133 | 0517 | 0577 | 1406 | 1428 | 2362 | 4602 (विनय लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण) | 4992 (महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर) | 5088 | 7703 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0491 | 2210 | 2366 | 4753 | 6254 | 7045 | 7250 | 7882 | 9017 | 9120 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0490 | 0902 | 2572 | 4515 | 6779 | 7541 | 7639 | 7666 | 8435 | 8865 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 2474 | 2674 | 2715 | 4241 | 4829 | 4955 | 5051 | 7071 | 9387 | 9451 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1510 | 2216 | 2642 | 3631 | 4833 | 5780 | 6758 | 7507 | 8144 | 8887 |
| | | 1541 | 2221 | 2662 | 3654 | 4840 | 5813 | 6766 | 7517 | 8188 | 8958 |
| 0037 | 1047 | 1615 | 2251 | 2675 | 3671 | 4864 | 5816 | 6808 | 7542 | 8280 | 8980 |
| 0097 | 1100 | 1659 | 2254 | 2747 | 3737 | 4924 | 6008 | 6862 | 7546 | 8285 | 9190 |
| 0125 | 1109 | 1664 | 2256 | 2754 | 3814 | 5056 | 6016 | 6864 | 7677 | 8393 | 9194 |
| 0133 | 1117 | 1751 | 2276 | 2782 | 3824 | 5077 | 6183 | 6867 | 7679 | 8407 | 9233 |
| 0179 | 1123 | 1767 | 2277 | 2826 | 3832 | 5130 | 6215 | 6947 | 7688 | 8412 | 9240 |
| 0379 | 1141 | 1796 | 2279 | 2901 | 3900 | 5251 | 6226 | 6988 | 7705 | 8414 | 9279 |
| 0564 | 1145 | 1817 | 2284 | 3142 | 3910 | 5339 | 6270 | 6992 | 7737 | 8428 | 9305 |
| 0565 | 1146 | 1841 | 2290 | 3175 | 4091 | 5342 | 6306 | 7017 | 7739 | 8433 | 9369 |
| 0577 | 1187 | 1871 | 2292 | 3193 | 4093 | 5364 | 6352 | 7022 | 7749 | 8448 | 9393 |
| 0600 | 1192 | 1872 | 2302 | 3238 | 4155 | 5387 | 6431 | 7121 | 7765 | 8587 | 9398 |
| 0670 | 1198 | 1932 | 2336 | 3294 | 4206 | 5451 | 6441 | 7134 | 7780 | 8589 | 9496 |
| 0703 | 1214 | 1934 | 2377 | 3312 | 4214 | 5492 | 6477 | 7148 | 7787 | 8593 | 9573 |
| 0712 | 1243 | 1990 | 2429 | 3355 | 4220 | 5506 | 6557 | 7167 | 7791 | 8638 | 9594 |
| 0752 | 1312 | 1994 | 2453 | 3364 | 4244 | 5523 | 6588 | 7186 | 7792 | 8640 | 9629 |
| 0804 | 1316 | 2076 | 2462 | 3375 | 4345 | 5552 | 6629 | 7270 | 7917 | 8761 | 9810 |
| 0843 | 1368 | 2127 | 2492 | 3383 | 4378 | 5585 | 6645 | 7324 | 7926 | 8814 | 9854 |
| 0851 | 1369 | 2128 | 2528 | 3413 | 4423 | 5597 | 6646 | 7329 | 8017 | 8815 | 9903 |
| 0902 | 1395 | 2129 | 2545 | 3451 | 4440 | 5705 | 6696 | 7337 | 8020 | 8823 | 9919 |
| 1020 | 1415 | 2156 | 2585 | 3483 | 4445 | 5725 | 6706 | 7421 | 8084 | 8860 | 9923 |
| 1023 | 1467 | 2210 | 2612 | 3595 | 4828 | 5775 | 6746 | 7491 | 8114 | 8877 | 9956 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ११/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| ३ | ४ | ९ |
| ३० | ४० | ९० |
| ३५ | ४५ | ९५ |
| १३९ | १४९ | १८० |
| २४७ | ३४७ | २७० |

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 50 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 10/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-01 : 5960**

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 0752 — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

तिसरे बक्षिस रु. 2000/- : 0723 — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0737 | 1231 | 1392 | 2698 | 3288 | 3361 | 7063 | 7623 | 9530 | 9770 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1022 | 1746 | 3224 | 4221 | 4635 | 5339 | 5424 | 5477 | 6363 | 6860 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1313 | 2079 | 2924 | 3553 | 4092 | 5258 | 8683 | 8929 | 9385 | 9764 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1127 | 2095 | 3174 | 4355 | 5139 | 5952 | 7511 | 8286 | 9199 |
| | | 1141 | 2122 | 3213 | 4364 | 5145 | 5953 | 7658 | 8288 | 9260 |
| | | 1146 | 2128 | 3235 | 4404 | 5156 | 6016 | 7707 | 8361 | 9282 |
| 0030 | 0337 | 1153 | 2225 | 3376 | 4410 | 5217 | 6186 | 7730 | 8371 | 9329 |
| 0060 | 0416 | 1167 | 2238 | 3445 | 4440 | 5322 | 6231 | 7746 | 8394 | 9396 |
| 0063 | 0490 | 1174 | 2285 | 3484 | 4477 | 5338 | 6336 | 7754 | 8398 | 9400 |
| 0070 | 0509 | 1189 | 2293 | 3539 | 4478 | 5458 | 6364 | 7757 | 8412 | 9419 |
| 0072 | 0676 | 1198 | 2378 | 3563 | 4542 | 5526 | 6396 | 7765 | 8508 | 9449 |
| 0079 | 0718 | 1265 | 2409 | 3702 | 4608 | 5535 | 6446 | 7767 | 8524 | 9458 |
| 0104 | 0735 | 1267 | 2461 | 3737 | 4614 | 5543 | 6458 | 7792 | 8547 | 9516 |
| 0107 | 0770 | 1301 | 2671 | 3883 | 4630 | 5615 | 6471 | 7799 | 8556 | 9634 |
| 0142 | 0792 | 1311 | 2678 | 3897 | 4663 | 5678 | 6481 | 7864 | 8634 | 9636 |
| 0146 | 0805 | 1318 | 2694 | 3936 | 4693 | 5699 | 6488 | 7879 | 8810 | 9649 |
| 0147 | 0809 | 1356 | 2721 | 4104 | 4802 | 5719 | 6625 | 7944 | 8871 | 9690 |
| 0150 | 0811 | 1489 | 2761 | 4151 | 4825 | 5753 | 6626 | 7976 | 8878 | 9723 |
| 0184 | 0867 | 1511 | 2811 | 4159 | 4845 | 5755 | 6859 | 8042 | 8886 | 9832 |
| 0191 | 0961 | 1662 | 2822 | 4193 | 4941 | 5780 | 7030 | 8163 | 8965 | 9903 |
| 0212 | 1091 | 1692 | 2863 | 4240 | 5052 | 5798 | 7067 | 8246 | 8980 | 9906 |
| 0271 | 1097 | 1851 | 2920 | 4297 | 5059 | 5836 | 7170 | 8257 | 9091 | 9934 |
| 0307 | 1102 | 1911 | 3131 | 4304 | 5061 | 5945 | 7297 | 8264 | 9139 | 9942 |
| 0323 | 1108 | 1921 | 3163 | 4324 | 5100 | 5951 | 7436 | 8280 | 9185 | 9953 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 50 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 10/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SV-08 : 9916**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1308 | 2749 | 2786 | 4034 | 4365 | 4808 | 5984 (श्री एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 6418 (विराग एन्टरप्रायझेस, नाशिक) | 9428 | 9984 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1858 | 3168 | 4207 | 5221 | 6266 | 7151 | 8158 | 8619 | 8681 | 9513 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 3026 | 3966 | 4382 | 4393 | 5081 | 7221 | 7531 | 7960 | 9676 | 9764 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0918 | 1682 | 2794 | 3743 | 5853 | 6671 | 7708 | 8897 |
| | 1006 | 1706 | 2921 | 3768 | 5878 | 6994 | 7718 | 8982 |
| 0057 | 1071 | 1782 | 2924 | 3789 | 5932 | 7025 | 7897 | 9008 |
| 0247 | 1103 | 1861 | 2926 | 4065 | 5955 | 7066 | 8048 | 9128 |
| 0256 | 1127 | 2206 | 3033 | 4109 | 6094 | 7178 | 8371 | 9331 |
| 0264 | 1139 | 2222 | 3131 | 4501 | 6219 | 7274 | 8380 | 9419 |
| 0266 | 1387 | 2223 | 3162 | 4579 | 6236 | 7374 | 8382 | 9591 |
| 0282 | 1388 | 2402 | 3191 | 4834 | 6249 | 7420 | 8398 | 9729 |
| 0301 | 1439 | 2425 | 3205 | 4956 | 6444 | 7447 | 8449 | 9883 |
| 0371 | 1494 | 2443 | 3342 | 5106 | 6523 | 7512 | 8508 | 9891 |
| 0575 | 1517 | 2502 | 3375 | 5120 | 6536 | 7526 | 8554 | 9917 |
| 0813 | 1575 | 2542 | 3509 | 5479 | 6601 | 7639 | 8726 | 9929 |
| 0901 | 1603 | 2760 | 3636 | 5581 | 6637 | 7657 | 8788 | 9948 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी — सोडत दर बुधवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 50 — सोडत दिनांक 10/12/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **AK-05 : 5403**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) : 5403 — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 2212 — नाझ लॉटरी - रोहा; श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (2 बक्षिसे)

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0488 | 1352 | 1604 | 3896 | 5853 | 6409 | 7022 | 7997 | 8115 | 9333 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0615 | 3098 | 4523 | 6051 | 6244 | 7222 | 8784 | 9089 | 9924 | 9966 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0604 | 4716 | 5677 | 7367 | 7863 | 8280 | 8969 | 9450 | 9822 | 9865 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0987 | 1355 | 1860 | 2037 | 3654 | 3982 | 6593 | 7401 | 7894 | 9810 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1192 | 2012 | 2681 | 3385 | 3979 | 4649 | 5561 | 6186 | 7060 | 7754 | 8618 | 9428 |
| | | 1202 | 2022 | 2700 | 3388 | 3983 | 4664 | 5572 | 6197 | 7062 | 7759 | 8663 | 9438 |
| | | 1208 | 2042 | 2702 | 3395 | 3987 | 4707 | 5583 | 6224 | 7064 | 7764 | 8665 | 9445 |
| | | 1217 | 2126 | 2708 | 3403 | 4011 | 4741 | 5585 | 6244 | 7073 | 7765 | 8668 | 9469 |
| | | 1232 | 2131 | 2711 | 3421 | 4095 | 4764 | 5599 | 6296 | 7077 | 7767 | 8677 | 9471 |
| 0004 | 0673 | 1254 | 2142 | 2723 | 3424 | 4122 | 4809 | 5600 | 6335 | 7124 | 7772 | 8685 | 9508 |
| 0011 | 0718 | 1304 | 2159 | 2726 | 3438 | 4137 | 4863 | 5640 | 6337 | 7150 | 7775 | 8741 | 9523 |
| 0014 | 0721 | 1311 | 2164 | 2727 | 3535 | 4204 | 4869 | 5642 | 6347 | 7158 | 7780 | 8747 | 9539 |
| 0017 | 0754 | 1312 | 2212 | 2778 | 3538 | 4216 | 4920 | 5662 | 6388 | 7204 | 7825 | 8753 | 9545 |
| 0050 | 0798 | 1342 | 2219 | 2812 | 3539 | 4244 | 4961 | 5676 | 6391 | 7269 | 7859 | 8789 | 9552 |
| 0053 | 0800 | 1358 | 2223 | 2855 | 3540 | 4260 | 5050 | 5711 | 6400 | 7320 | 7876 | 8798 | 9563 |
| 0060 | 0803 | 1359 | 2224 | 2914 | 3543 | 4265 | 5075 | 5738 | 6418 | 7336 | 7883 | 8839 | 9568 |
| 0064 | 0805 | 1361 | 2229 | 2948 | 3590 | 4293 | 5076 | 5753 | 6450 | 7337 | 7895 | 8866 | 9580 |
| 0070 | 0807 | 1367 | 2238 | 2974 | 3592 | 4295 | 5093 | 5774 | 6461 | 7357 | 7919 | 8868 | 9592 |
| 0077 | 0819 | 1370 | 2246 | 2991 | 3623 | 4354 | 5113 | 5805 | 6484 | 7358 | 7951 | 8881 | 9615 |
| 0084 | 0827 | 1409 | 2253 | 3030 | 3627 | 4358 | 5125 | 5826 | 6503 | 7366 | 7984 | 8886 | 9634 |
| 0085 | 0850 | 1410 | 2266 | 3033 | 3665 | 4374 | 5130 | 5868 | 6506 | 7373 | 8015 | 8888 | 9635 |
| 0107 | 0852 | 1416 | 2272 | 3036 | 3696 | 4377 | 5134 | 5886 | 6514 | 7378 | 8021 | 8912 | 9636 |
| 0114 | 0904 | 1436 | 2292 | 3102 | 3715 | 4389 | 5148 | 5895 | 6543 | 7407 | 8028 | 8928 | 9639 |
| 0130 | 0940 | 1462 | 2294 | 3113 | 3723 | 4398 | 5151 | 5930 | 6559 | 7415 | 8040 | 8984 | 9640 |
| 0206 | 0952 | 1495 | 2313 | 3163 | 3733 | 4403 | 5155 | 5938 | 6609 | 7427 | 8044 | 8986 | 9680 |
| 0260 | 0988 | 1497 | 2314 | 3173 | 3734 | 4414 | 5195 | 5956 | 6619 | 7430 | 8087 | 8989 | 9690 |
| 0272 | 0991 | 1499 | 2318 | 3188 | 3746 | 4423 | 5315 | 5977 | 6625 | 7443 | 8160 | 9022 | 9692 |
| 0286 | 1019 | 1511 | 2323 | 3189 | 3761 | 4425 | 5352 | 5985 | 6631 | 7472 | 8186 | 9044 | 9719 |
| 0303 | 1024 | 1541 | 2329 | 3196 | 3764 | 4434 | 5360 | 5995 | 6661 | 7475 | 8188 | 9089 | 9749 |
| 0338 | 1052 | 1572 | 2384 | 3218 | 3768 | 4437 | 5379 | 6029 | 6666 | 7510 | 8237 | 9091 | 9805 |
| 0381 | 1061 | 1655 | 2392 | 3223 | 3803 | 4444 | 5386 | 6062 | 6667 | 7512 | 8260 | 9150 | 9814 |
| 0400 | 1081 | 1753 | 2421 | 3240 | 3822 | 4454 | 5404 | 6076 | 6684 | 7527 | 8292 | 9174 | 9868 |
| 0443 | 1091 | 1762 | 2428 | 3244 | 3833 | 4460 | 5417 | 6088 | 6699 | 7542 | 8300 | 9192 | 9884 |
| 0450 | 1110 | 1785 | 2512 | 3261 | 3834 | 4472 | 5496 | 6093 | 6703 | 7576 | 8330 | 9193 | 9887 |
| 0458 | 1112 | 1801 | 2517 | 3301 | 3837 | 4474 | 5501 | 6094 | 6722 | 7594 | 8378 | 9209 | 9895 |
| 0479 | 1114 | 1811 | 2523 | 3312 | 3861 | 4477 | 5506 | 6101 | 6743 | 7630 | 8386 | 9230 | 9900 |
| 0488 | 1119 | 1852 | 2542 | 3324 | 3880 | 4564 | 5507 | 6108 | 6796 | 7670 | 8423 | 9279 | 9922 |
| 0508 | 1123 | 1856 | 2553 | 3327 | 3885 | 4584 | 5528 | 6129 | 6869 | 7692 | 8453 | 9286 | 9928 |
| 0568 | 1140 | 1878 | 2613 | 3340 | 3889 | 4595 | 5529 | 6152 | 6953 | 7726 | 8458 | 9300 | 9933 |
| 0571 | 1149 | 1881 | 2620 | 3359 | 3891 | 4596 | 5538 | 6154 | 6956 | 7733 | 8463 | 9364 | 9940 |
| 0605 | 1160 | 1885 | 2621 | 3371 | 3934 | 4598 | 5545 | 6160 | 6966 | 7737 | 8464 | 9381 | 9968 |
| 0609 | 1163 | 1916 | 2662 | 3381 | 3967 | 4622 | 5550 | 6161 | 6986 | 7747 | 8484 | 9392 | 9971 |
| 0634 | 1171 | 1927 | 2675 | 3383 | 3969 | 4624 | 5552 | 6166 | 6996 | 7750 | 8580 | 9394 | 9977 |
| 0671 | 1183 | 2002 | 2678 | 3384 | 3970 | 4628 | 5559 | 6169 | 7007 | 7752 | 8600 | 9396 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# देशातील पहिली 'वंदे भारत' स्लीपर पाटणा ते दिल्ली धावणार



■ पाटणा

**भारतातील** पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन बिहारमधील पाटणा ते दिल्ली या मार्गावर धावणार आहे. १६० किमीचा वेग असणाऱ्या या गाडीमध्ये विमानासारख्या सोयीसुविधा उपलब्ध असतील. बंगळुरुमधील बीईएमएल कारखान्यात सुरू असलेले वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या रॅकचे काम १२ डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर पाटणा आणि दिल्ली या मार्गावर चाचणी होईल. जानेवारी २०२६ च्या आधीच ट्रेन रुळावर धावणार आहे. आठवड्यातून सहा दिवस धावणारी ही ट्रेन संध्याकाळी पाटणाहून निघेल आणि सकाळी दिल्लीत पोहोचेल. संध्याकाळी दिल्लीहून निघेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पाटणा येथे पोहोचेल. हा प्रवास फक्त ८ तासांत पूर्ण होईल. वंदे भारत स्लीपर ट्रेनमध्ये १६ डबे असतील.

# दोन ज्योतिर्लिंगासह दक्षिण दर्शन यात्रा १७ जानेवारीपासून

■ रीवा

**इंडियन** रेल्वे कॅटरिंग अँड टूरिझम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने भारत गौरव पर्यटक ट्रेनमधून दोन ज्योतिर्लिंग आणि दक्षिण भारताचे दर्शन घडणार आहे. ही 'भारत गौरव' पर्यटक ट्रेन पुढील वर्षी १७ जानेवारीपासून मध्य प्रदेशातील रीवा येथून निघणार आहे. ही यात्रा १० दिवस ११ रात्री अशी राहणार आहे. या गाडीला स्लीपर कोच, थर्ड एसी आणि सेकंड एसी आहे. त्यासाठी अनुक्रमे २० हजार ४०० रुपये, ३३ हजार ७०० रुपये आणि ४४ हजार ५०० रुपये प्रति व्यक्ती असे भाडे ठरविण्यात आले आहे. तिकीट काढताना एजंटमार्फतही बुकिंग उपलब्ध आहे.या यात्रेत तिरुपती, रामेश्वरम (ज्योतिर्लिंग) मदुराई, कन्याकुमारी आणि श्रीशैलम (मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग) या प्रमुख धार्मिक स्थळांचे दर्शन घडविण्यात येणार आहे.

# ६ वर्षांच्या मुलीवर अत्याचार अपयशी ! गुप्तांगात रॉड घुसवला

■ अहमदाबाद

**गुजरातमध्ये** राजकोट जिल्ह्यातील अटकोट येथे ६ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार अपयशी ठरल्याने आरोपीने मुलीच्या गुप्तांगात रॉड घुसविण्याचे क्रूरकृत्य केले. या घटनेने परिसरात खळबळ निर्माण झाली. याप्रकरणी पोलिसांनी रामसिंग तेरसिंग (३०) या आरोपीला अटक केली. त्याच्यावर पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला.

दाहोद जिल्ह्यातील एक मजूर कुटुंब अटकोट पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या एका गावाजवळील शेतात काम करते. ४ डिसेंबर रोजी कुटुंब शेतात काम करत असताना त्यांची सहा वर्षे आठ महिन्यांची मुलगी जवळच खेळत होती. आरोपीने मुलीचे अपहरण केले आणि तिचा गळा दाबून लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मुलगी ओरडताच त्याने तिच्या गुप्तांगात धारदार रॉडसारखे शस्त्र घुसवले. त्यानंतर मुलीला रक्तबंबाळ अवस्थेत सोडून आरोपी पळून गेला.कुटुंबियांनी मुलीचा शोध घेतला तेव्हा त्यांना ती रक्ताच्या थारोळ्यात आढळली. तिची गंभीर प्रकृती पाहून तिला ताबडतोब राजकोट येथील रुग्णालयात दाखल केले. राजकोट ग्रामीण पोलीस अधीक्षक विजयसिंह गुर्जर यांनी सांगितले की, याप्रकरणी आरोपीच्या शोधासाठी १० पथके तैनात केली होती. यादरम्यान १०० संशयितांची चौकशी झाली.त्यानंतर सुमारे १० आरोपींना बालरोग तज्ज्ञासह मुलीसमोर हजर केले. तेथे मुलीने मुख्य आरोपी रामसिंग तेरसिंगला ओळखले. त्याला अटक करून गुन्हा दाखल केला.आरोपी गुजरातच्या अटकोट येथे गवंड्याचे काम करतो. त्याला एक मुलगी आणि दोन मुलगे आहेत. आरोपीला घटनेच्या ठिकाणच्या शेजारील शेतातून पकडले.

# जगातील सर्वांत स्वच्छ सरोवराला पर्यटकांचा धोका

■ वेलिंग्टन



**न्यूझीलंडच्या** जंगलांमध्ये लपलेले 'ब्लू लेक' अर्थात 'रोटोमायरेवेनुआ' नावाचे सरोवर आहे.हे सरोवर जगातील सर्वात स्वच्छ गोड्या पाण्याचे सरोवर आहे. परंतु याच सरोवराला आता पर्यटकांकडून धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या सरोवराच्या पाण्याला स्पर्श करण्यास मनाई करण्यात आली आहे. जवळपास दहा वर्षांपूर्वी वैज्ञानिकांना आढळून आले होते की, या सरोवराचे पाणी इतके स्वच्छ आहे की, त्यामध्ये ७०-८० मीटर खालपर्यंत स्पष्टपणे पाहिले जाऊ शकते.पाण्याच्या याच अविश्वसनीय शुद्धतेमुळे हे सरोवर जगभरात प्रसिद्ध झाले. आता मात्र या सरोवरासाठी पर्यटकच धोका बनले आहेत. येथील स्थानिक माओरी जमात आणि संवर्धन अधिकारी आता पर्यटकांना त्यांचे बूट स्वच्छ करण्याची आणि पाण्याला स्पर्श न करण्याची विनंती करत आहेत.स्थानिक माओरी जमात पूर्वी येथे मृत लोकांची हाडे धुत होती. जेणेकरून त्यांच्या आत्म्याला स्वर्ग प्राप्त होईल. आजही माओरी लोक या पाण्याला 'तापु' म्हणजे स्पर्श करण्यास मनाई मानतात.२०१३ मध्ये जेव्हा हे सरोवर जगातील सर्वात स्वच्छ सरोवर असल्याची बातमी आली, तेव्हा त्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले.

देश विदेश

# १९४५ नंतर पहिल्यांदाच सीरियात संयुक्त राष्ट्रांचे पथक

■ दमास्कस

**सन** १९४५ नंतर पहिल्यांदाच संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीचे पथक सीरियामध्ये दाखल झाले आहे. त्यामुळे या युद्धग्रस्त देशात राजकीय स्थैर्य आणि शांतता प्रस्थापित होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे १५ सदस्य देश आहेत.१९४५ मध्ये सुरक्षा परिषदेची स्थापना झाली.तेव्हापासून या सुरक्षा परिषदेच्या प्रतिनिधी मंडळाचा हा पहिलाच सीरिया दौरा आहे. सीरियाचे माजी राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांच्या सरकारच्या पतनाला एक वर्ष पूर्ण होत आले असून देश नव्या सरकारच्या माध्यमातून पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय समुदायात सहभागी होऊ पहात आहे

नेमक्या अशा वेळी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे पथक सीरियामध्ये पोहोचले आहे. नवे हंगामी राष्ट्राध्यक्ष आणि माजी इस्लामिक विद्रोही कमांडर अहमद अल-शरा यांच्या नेतृत्वाखाली सीरिया सध्या मोठ्या राजकीय संक्रमणातून जात आहे.

# ऑस्ट्रेलियात सोळा वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया बंदी

■ कॅनबेरा



**सोशल** मीडियाच्या दुष्परिणामांपासून वाचण्यासाठी सोळा वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर ऑस्ट्रेलियाच्या सरकारने बंदी आणली आहे. असा कायदा करणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश बनला आहे. नव्या कायद्यानुसार टिकटॉक, युट्यूब, इन्स्टाग्राम आणि फेसबूकसह दहा प्रमुख सोशल मीडिया कंपन्यांना १६ वर्षांखालील मुला-मुलींची अकाउंट ब्लॉक करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसे न करणाऱ्या सोशल मीडिया कंपन्यांना तीन कोटी डॉलर एवढा दंड ठोठावला जाणार आहे. दंडाच्या या तरतुदीवर सोशल मीडिया कंपन्यांनी टीका केली आहे.

# आता मुंबई मेट्रो वनचे तिकीट उबर ॲपवर

■ मुंबई



मेट्रो वनची तिकिटे आता उबर ॲपद्वारे थेट खरेदी करता येतील, अशी घोषणा मुंबई मेट्रो वनने केली आहे. त्यामुळे आता प्रवाशांसाठी ते अधिक सोईस्कर झाले आहे. प्रवासी आता मेट्रो तिकिटे आपल्या सोईनुसार ॲपवर घेऊ शकतील. मुंबई मेट्रो वन उबरसोबत भागीदारी केल्याने आता एकाच ॲपद्वारे कॅब,ऑटो आणि मेट्रो वनचे नियोजन करता येणार आहे. मुंबई मेट्रो वनचे सीईओ म्हणाले की, मेट्रो प्रवास शक्य तितका सहज आणि सुलभ करणे हे आमचे ध्येय आहे.

# कर्नाटकचे तूर शेतकरी संकटात मुख्यमंत्र्यांचे पंतप्रधानांना पत्र

■ बंगळुरू

**कर्नाटकचे** मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून तुरडाळ उत्पादन शेतकऱ्यांबाबत चिंता व्यक्त केली आहे. डिसेंबर-जानेवारी दरम्यान तुरडाळची सर्वाधिक आवक अपेक्षित आहे. केंद्र सरकार फेब्रुवारी-मार्चमध्येच खरेदी केंद्र उघडते. त्यामुळे तुरडाळीचे भाव कोसळून शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती आहे. सिद्धरामय्या यांनी पत्र लिहून पंतप्रधान यांचे लक्ष वेधले आहे की, कर्नाटक सरकारने ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रस्ताव पाठवून नाफेड आणि एनसीसीएफ मार्फत तुरडाळीची आधारित किमतीत खरेदीला तात्काळ मंजुरी मागितली होती.

# शिपाई, ड्रायव्हर पदभरतीची आयबीपीएसमार्फत परीक्षा

■ मुंबई

**राज्य बँकेचे धोरण**

राज्यातील जिल्हा सहकारी बँकांमधील नोकर भरतीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि भरती प्रक्रियेमधील गैरप्रकार टाळण्यासाठी या पुढे या बँकांमधील सरळसेवा भरती आय.बी.पी.एस., अथवा टी.सी.एस. यासारख्या संस्थाकडूनच केली जावी याबाबत शासनस्तरावर उपाययोजना केल्या जात असल्याच्या बातम्या नुकत्याच प्रसिध्द झाल्या आहेत. यापार्श्वभूमीवर राज्य सहकारी बँकेने आपल्या सरळसेवा भरती व अंतर्गत बढती परिक्षादेखील २०२१ पासून आय.बी.पी.एस. या नामांकित स्वायत्त संस्थेमार्फतच धोरण राबविले आहे. यंदादेखील राज्य बँकेने शिपाई व ड्रायव्हर पदांवरील भरतीसाठी देखील आय.बी.पी.एस. मार्फत प्रक्रिया राबविली आहे. उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा २५ सप्टेंबर रोजी पार पडली. तर अंतिम मुलाखत आज आय.बी.पी.एस. मार्फतच झाल्या.

# बेशिस्त चालकांना ओवाळली आरती! महिलेची नामी शक्कल

■ पुणे

**फुटपाथवरून** वाहने चालविणाऱ्यांसाठी पुणे पाषाण येथील एका महिलेने नामी शक्कल लढवली. तिने त्यांची आरती ओवाळली. हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. रस्त्यावर ट्रॅफिक जॅम झाल्यावर काही वाहनचालक आपली वाहने फुटपाथवर वळवतात. त्यामुळे पादचाऱ्यांची गैरसोय होते. अशा वाहनचालकांना आळा घालण्यासाठी महिलेने ही कृती केली. त्यामागे महिलेचा हेतू या वाहनचालकांना त्यांची चूक कळावी, इतकाच होता. त्यावर नेटिझन्सनी या व्हिडिओवर विविध प्रतिक्रिया दिल्या असून काही उपाययोजनाही सुचवल्या आहेत.

# कुडाळ घनकचरा प्रकल्पासाठी एमआयडीसीची २७ गुंठे जागा

**प्रशासनाने मंजुरी दिली**

■ कुडाळ

**एमआयडीसी** क्षेत्रातील २७ गुंठे जमीन अखेर एमआयडीसी प्रशासनाने कुडाळ नगरपंचायतीच्या घनकचरा प्रकल्पासाठी देण्यास मंजुरी दिली आहे.

मंजूर झालेल्या जागेमुळे घनकचरा प्रकल्पाची अत्याधुनिक यंत्रणा येथे उभारली जाणार आहे. कुडाळ नगरपंचायतीचा अत्याधुनिक घनकचरा प्रकल्प उभारण्यासाठी नगरपंचायतीने एमआयडीसीकडे यापूर्वी १८ गुंठे जमीन घेतली आहे; मात्र या प्रकल्पासाठी अजून २७ गुंठे जमिनीची आवश्यकता होती जेणेकरून हा प्रकल्प अधिक चांगल्या प्रकारे राबवता येऊ शकेल. त्या ठिकाणी आधुनिक यंत्रसामग्री बसवता येईल.यासाठी गेले काही महिने प्रयत्न सुरू होते. या अत्याधुनिक घनकचरा प्रकल्पासाठी २७ गुंठे जमीन एमआयडीसी प्रशासनाने मंजूर केली आहे.पूर्वी १८ गुंठे आणि आता २७ गुंठे अशी एकूण ४५ गुंठे जागा आता या प्रकल्पासाठी एकाच ठिकाणी मिळाली आहे.

# अंधेरी, वांद्रे आणि धारावीत शुक्रवारी पाणीपुरवठा बंद राहणार

■ मुंबई



**पश्चिम** उपनगरातील विलेपार्ले अंधेरी पूर्व भाग (के-पूर्व विभाग), वांद्रे पूर्व भाग(एच पूर्व विभाग) तसेच धारावी या (जी-उत्तर ) विभागातील मोठ्या आकाराच्या जलवाहिनी जोडणीची कामे हाती घेतली जाणार आहेत. ही कार्यवाही शुक्रवार, १२ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता सुरू होईल. हे काम शनिवारी १३ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.एकूण २४ तास काम सुरू राहणार आहे. परिणामी, या के-पूर्व, एच-पूर्व व जी-उत्तर विभागातील काही भागांचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तर के-पूर्व विभागात काही भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

पालिकेच्या के-पूर्व,एच-पूर्व व जी उत्तर विभागातील विविध ठिकाणची १८०० मिलीमीटर व्यासाची तानसा पश्चिम जलवाहिनी,१२०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी,२४०० मिलीमीटर व्यासाची वैतरणा जलवाहिनी आणि जी-उत्तर विभागातील १५०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी जोडणीचे काम मुंबई महापालिकेने हाती घेतले आहे.ही कामे शुक्रवार १२ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजेपासून शनिवार १३ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत एकूण २४ तास सुरु राहणार आहे.

के-पूर्व, एच-पूर्व व जी-उत्तर विभागातील नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पाण्याचा आवश्यक साठा करुन ठेवावा.दुरुस्तीच्या कालावधीत काटकसरीने पाणी वापरावे.तसेच खबरदारीचा उपाय म्हणून पुढील काही दिवस पाणी उकळून गाळून प्यावे,असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

# कोल्हापूर शहरातील सायबर चौकात टेम्पोसह ७ वाहनांचा विचित्र अपघात

■ कोल्हापूर



**शहरातील** मध्यवर्ती सायबर चौकात ब्रेक निकामी झालेल्या ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रकने सिग्नलला थांबलेल्या तीन मोटारी, मालवाहतूक टेम्पो, कर्मचाऱ्यांची वाहतूक करणारी मिनी लक्झरी व अन्य दोन वाहने अशा सात वाहनांना जोरदार धडक दिली. काल रात्री सात वाजताच्या सुमारास घडलेल्या या विचित्र अपघातात चालकांसह पाचजण जखमी झाले.

गर्दीने गजबजलेल्या सायबर चौकात अपघात झाल्याने एकच गोंधळ उडाला. उशिरापर्यंत येथील वाहतूक विस्कळीत झाली होती. रात्री उशिरा अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून हटविल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली. अपघातात ट्रकचालक प्रदीप सुतार (३७) टेम्पो चालक अभिषेक माळी (२७), मोटारचालक सुनील रेडेकर (५०) दिलीप पटेल (५०) जखमी झाले. रात्री उशिरा ट्रकचालक प्रदीप सुतारला राजारामपुरी पोलिसांनी ताब्यात घेतले.

# सोमवारी इचलकरंजी शहरात शंभूतीर्थाचा लोकार्पण सोहळा

**मुख्यमंत्र्यांची उपस्थिती**

■ अहमदाबाद

**इचलकरंजी** - शहरातील कॉ.मलाबादे चौकाचे सुशोभिकरण करुन त्याठिकाणी भव्य असे श्री शंभुतीर्थ साकारले आहे.याठिकाणी उभारण्यात आलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्याचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवार १५ डिसेंबर रोजी होणार आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शहरातील विविध भूमिपूजनही करण्यात येणार आहे,अशी माहिती इचलकरंजी पालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील यांनी दिली. महापालिकेच्यावतीने चौक सुशोभिकरण अंतर्गत कॉ.के.एल. मलाबादे चौकात श्री शंभुतीर्थ साकारले आहे. त्याठिकाणी कोल्हापुरातील मूतिकारांकडून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा तयार करून घेण्यात आला आहे.३ डिसेंबरला या पुतळ्याचा इचलकरंजीत प्रथमदर्शन सोहळा आणि भव्य मिरवणूक झाली.सध्या दररोज शंभुतीर्थावर विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम सुरू आहेत.त्यामध्ये शहरातील मुख्यमार्गावर भगवे वस्त्र आणि पताका,आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. आता १५ डिसेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुतळ्याचा लोकार्पण सोहळा आणि विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे, त्यामुळे या सोहळ्याकडे संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

# वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहतीच्या पाडकामामुळे हवेच्या प्रदूषणात वाढ

■ मुंबई

**वांद्रे** पूर्व येथील शासकीय वसाहतींच्या जुन्या इमारती पाडून त्या जागी मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी पाडकाम सूरू आहे. हे काम सुरू असताना मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होत असून प्रदूषणात वाढ होत होत. परिणामी येथील रहिवासी आणि प्रवाशांना या प्रदूषणाचा त्रास होत आहे. मात्र, महापालिकेकडून अद्याप याबाबत कोणतीही कारवाई केलेली गेली नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. मुंबईतील वाढत्या प्रदूषणाला नियंत्रणात आणण्यासाठी महापालिकेने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या तत्त्वांचे पालन न करणाऱ्या खाजगी बांधकामांवर पालिका कारवाई करीत आहे. असे असताना वांद्रे शासकीय वसाहतींच्या जुन्या इमारती पाडताना कोणत्याही तत्त्वाचे पालन केले जात नसल्याचे दिसून येत आहे. बांधकाम पाडताना निर्माण होणाऱ्या मलबा, धूळ, काँक्रिट, विटा, स्टीलचे तुकडे, खडक असा कचरा वाहनात भरून दुसरीकडे घेऊन जाताना काळजी घेतली जात नाही. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात धूळ आणि दूषित हवा वाहत असते. त्याचा त्रास येथील रहिवासी आणि नागरिकांना होत आहे. नुकतीच महापालिका अतिरिक्त आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे यांनीही येथे भेट दिली होती.

# गडचिरोलीत ११ माओवाद्यांचे पोलिसांसमोर आत्मसमर्पण

■ गडचिरोली

**राज्याच्या** पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या उपस्थितीत गडचिरोलीमध्ये ११ जहाल माओवादी नक्षलवाद्यांनी शस्त्रांसह आत्मसमर्पण केले. यामध्ये डिव्हिजनल कमिटी सदस्य, प्लाटून कमिटी सदस्य, एरिया कमिटी सदस्य अशा नक्षलवादी चळवळीतील उच्चपदांवरील नक्षल्यांचा समावेश आहे. या सर्वांवर मिळून ८२ लाख रुपयांचे इनाम होते.

या ११ माओवाद्यांपैकी चार सदस्य शस्त्रांसह आणि पूर्ण गणवेशात उपस्थित राहिले होते. कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत हा आत्मसमर्पणाचा कार्यक्रम पार पडला. या नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग पत्करल्याने दंडकारण्यातील माओवादी चळवळीला जबरदस्त फटका बसला आहे, असे मानले जाते.

# बदलापुरात पुन्हा बिबट्या! वनविभाग तळ ठोकून

■ अंबरनाथ



**बदलापूर** शहराच्या सीमेवर असलेल्या आंबेशीव परिसरात दोन बकऱ्या फस्त करून बिबट्याने पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. बिबट्याच्या पायाचे ठसे आणि प्रत्यक्षदर्शी गावकऱ्यांच्या दाव्यामुळे वनविभागाने परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. बिबट्याच्या शोधासाठी वन विभागाच्या पथकाने या गावात तळ ठोकला आहे. आंबेशीव गावातील एका शेतकऱ्याच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या शेणाच्या गोवऱ्यांमध्ये बिबट्याच्या पायांचे ठसे आढळून आले.त्यानंतर लोकांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. मात्र त्यावेळी हे ठसे श्वान किंवा इतर कोणत्याही प्राण्याचे नसल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.मुरबाड,अंबरनाथ, कल्याण तालुक्यातील जंगल भागात अनेकदा बिबट्याचा वावर दिसून आला आहे. शेजारी असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातून अनेकदा माळशेजमार्गे बिबटे या मुरबाड,अंबरनाथ आणि कल्याण तालुक्यात आल्याचे दिसून आले आहे. दोन वर्षांपूर्वी जुन्नरमध्ये रेडिओ कॉलर लावलेला एक बिबट्या अंबरनाथ आणि कल्याण तालुक्यात अनेक महिने फेरफटका मारताना दिसला होता.

# गोरेगावमध्ये सिलिंडरचा स्फोट! तीन जण जखमी

■ मुंबई

**गोरेगाव** येथे राजाराम चाळीमध्ये सिलिंडर गळती झाल्याने स्फोट झाला व त्यानंतर लागलेल्या आगीत तीनजण जखमी झाले. इमारतीच्या तळमजल्यावरील १८० व १८१ नंबरच्या रुममध्ये आज सकाळी साडेसातच्या सुमारास ही घटना घडली. सिलिंडरच्या स्फोटानंतर लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी रहिवाशांनी अग्निशमन दलाचा बंब येईपर्यंत बादलीने पाणी मारले व इमारतीचा वीजपुरवठा खंडित केला.या आगीत मालतीदेवी (२८),अली जावेद शेख (३७), गुल महम्मद अली शेख (३८) हे जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# मानवतेच्या दीपोत्सवावर युनेस्कोची मोहोर

भारताच्या मानवी मूल्य जपणाऱ्या संस्कृती ,सण किंवा उत्सवांची जेव्हा जागतिक स्तरावर दखल घेतली जाते त्यावेळेला भारताचा तो सर्वात मोठा नैतिक धर्म ठरतो. युनेस्को ही जागतिक स्तरावरची महत्त्वपूर्ण संस्था आहे. जी प्रामुख्याने विविध देशातील सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक अशा गुणवैशिष्टयांची दखल घेत असते. ही वैशिष्टये त्या-त्या विभागाचे तिथल्या समाजव्यवस्थेचे शिवाय सांस्कृतिक आणि ऐतिहासिक गुणवैशिष्टयांचे वैश्विक मूल्यांकनच असते. आतापर्यंत भारताच्या भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक क्षेत्रातल्या अनेक गोष्टींना युनेस्कोने आपल्या हेरिटेज लिस्टमध्ये स्थान देऊन भारताचा गौरव केलेला आहे या सगळ्या भारतीय नावलौकिकाच्या शृंखलेत एकाअर्थी सर्वोच्च असा मानाचा तुरा खोवणारी घोषणा अलिकडेच युनेस्कोने केली. ती म्हणजे संपूर्ण भारतीयांसाठी अतिशय आनंदाचा सर्वोच्च उत्साहाचा आणि सुदृढ अशा सांस्कृतिक मानवी मूल्यांचे संवर्धन करणाऱ्या दीपावली या सणालाही युनेस्कोने आपल्या हेरिटेज लिस्टमध्ये स्थान दिले आहे. मानवतेचा सन्मान आणि गौरव करणारा दीपावलीचा हा महत्त्वपूर्ण सण असल्याचे युनेस्कोने म्हटले आहे.गेल्या काही वर्षापासून तर दीपावली हा सण भारताबाहेर जिथे जिथे भारतीय राहातात त्या त्या देशांमध्ये तितक्याच उत्साहाने दीपोत्सव साजरा होतो. अगदी युनेस्कोचे कार्यालय असलेल्या अमेरिकेतसुद्धा दरवर्षी या दीपोत्सवाची लोकप्रियता वाढते आहे व परदेशात राहाणाऱ्या भारतीयांच्या नव्या पिढीमध्ये आकर्षणही निर्माण होते आहे. संपूर्ण भारतात जवळपास पाच दिवस सलग सर्वत्र एकाच उत्साहाने दीपावली सण साजरा होतो. ज्यातून सामाजिक स्तरावरचे सौजन्य, सौहार्द म्हणजेच मानवी मूल्यांचे संवर्धन घडून येते. कदाचित म्हणूनच युनेस्कोला दीपोत्सवाचे विशेष महत्त्व जाणवले असावे. भारताकडून याबाबतचा प्रस्ताव कदाचित युनेस्कोकडे गेलाही असावा. परंतु उशिरा का होईना युनेस्कोच्या कार्यालयात दीपोत्सवाबाबतचा प्रकाश पडलेला दिसतो. या नव्या घटनेने सगळ्या भारतीयांना विशेष अभिमान वाटणे स्वाभाविक ठरते. यापूर्वी कुंभमेळा, गरबा यांचीदेखील युनेस्कोने दखल घेतलेली आहे.

**विवेकदीपाची दिवाळी**

यातला महत्त्वाचा भाग असा आहे की, साधारणपणे दीपावली हा हिंदूंचा सण आहे आणि तो हिंदू धर्मापुरताच मर्यादित आहे. म्हणजेच दीपावलीकडे एका विशिष्ट धार्मिक चौकटीतून पाहिले जात होते. खरे तर सनातन काळापासून भारताने विश्वकल्याणाची जी काही मूल्ये व्यक्त केली. त्यात वसुधैव कुटुंबकम म्हणजेच सगळ्या विश्वाला एक परिवार मानून मानवतेचे मूल्य सांगितले गेले होते. केवळ धर्माच्या चौकटीत कोणत्याच सणाला बंदिस्त न करता त्यातले वैश्विक मानवतेचे मूल्यच साकार करण्याचा भारतीय संस्कृतीने अखंडपणे प्रयत्न केलेला आहे. ज्या ज्ञानेश्वर माऊलींनी संपूर्ण विश्वाच्या कल्याणाचे पसायदान मागितले होते आणि संपूर्ण सृष्टी सुखी आणि समाधानी राहावी म्हणून शांतीचे देणेच आळवले होते. त्या ज्ञानेश्वरांनी दीपावलीचे वर्णन करताना मी अविवेकाची काजळी फेडुनी विवेकदीप उजळी

तै योगिया पाहे दिवाळी निरंतर।।

पुढे जाऊन ते असं म्हणतात की,

स्नेहाची दिवाळी फेडूनी काजळी

या दीपे ओवाळी जीवशीवी।

म्हणजेच अज्ञानाची काजळी दूर करणारी विवेकाचा किंवा ज्ञानाचा प्रकाश पसरवणारी आणि प्रेम करूणेने भरलेली ही दिवाळी म्हणजे जीवशीवाचे मिलन असल्याचे माऊलींनी म्हटले होते. भारतीयांच्या मनातील ही व्यापकता त्यांच्या सणातूनही व्यक्त होत राहिली. म्हणूनच दिवाळीतला हा दीपोत्सव हा सगळ्याच प्रकारच्या अध्यायाचा अंधकार दूर करणारा आणि मानवतेचा वर्षाव करणारा प्रकाशोत्सव ठरतो. आज या दीपोत्सवाला युनेस्कोकडून मिळालेली ही अधिकृत मान्यता म्हणजे भारतीय सनातन संस्कृतीचा आजच्या आधुनिक काळाच्या संदर्भातही केला गेलेला विश्वगौरव ठरतो. सर्वात मोठा दीपोत्सव आणि त्यातला हा विश्वव्यापी मानवी मूल्यांचा आशय याला जागतिक स्तरावर अशाप्रकारे मान्यता मिळणे ही निश्चितच भूषणावह गोष्ट ठरते. खरे तर तो आता मानवतेचा आणि ज्ञानाचा विचार संस्कार दृढमूल करणारा विश्वाचा प्रकाशोत्सव म्हणून साजरा होऊ शकतो. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी युनेस्कोच्या या पुढाकाराबद्दल आनंद तर व्यक्त केलाच. परंतु भारताने अनेक शतके जपलेल्या वैश्विक शांततेच्या सांस्कृतिक विचारांवर उमटलेली ती जागतिक मोहोर ठरते.

**सर्वात मोठा सण आनंदाचे धन**

दरवर्षी दीपावली सण भारताच्या घराघरात साजरा होतो. त्याचे स्वरूप सर्वांना सामावून घेणारे असते. कौटुंबिक स्तरावर नातेवाईक तर यानिमित्ताने एकत्र येतातच. पण सामाजिक स्तरावर आप्तस्वकीयांना एकत्र येण्याची मोठी संधी प्राप्त होते. खरे तर या सणात परकीय म्हणून असा कोणी राहातच नाही. या काळात दिल्या जाणाऱ्या शुभेच्छा या केवळ औपचारिकतेचा भाग नसतो. तर तो मानवी स्वभावाचा प्रगट होणारा प्रगल्भ आविष्कार असतो. मतभेद किंवा कोणत्याही द्वेष मत्सराला थारा न देता एकमेकांमधले सौजन्य, सामंजस्य, सौहार्द अतिशय स्वाभाविकपणे या काळामध्ये प्रकट होते. एकमेकांना मिठाई, फराळ किंवा गोड पदार्थ देण्यापासून एकमेकांमधले नातेसंबंध दृढ करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू परंपरेच्या प्रवाहाचे निर्मळ दर्शन घडवतात. प्रत्येक व्यक्तीमध्ये असलेले ईश्वरी तत्त्व आणि एक मनुष्य म्हणून व्यक्त होणारा स्नेह संस्काराच्या रुपाने पुढच्या पिढीकडे संक्रमित होत राहातो. दुष्टशक्ती किंवा अनिष्ट प्रवृत्तींचा विरोध व्यक्त करून त्याला या गुणसंपन्न मानवी समाजात स्थान मिळता कामा नये अशीच प्रबळ इच्छा त्यानिमित्ताने व्यक्त होते. भारतीयांसाठी अतिशय महत्त्वाची असणारी ही दीपावली युनेस्कोच्या या गौरवानंतर अधिक तेजस्वी झाली आहे कारण जगाने या सणातला मानवतेचा विचार महत्वपूर्ण असल्याचे स्वीकारले आहे. सर्वात मोठा सण आणि त्यात दडलेले मानवी मूल्यांचे धन सर्वांनाच कृतज्ञ करणारे ठरते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

मिळवणं आणि गमावणं याहीपेक्षा कठीण आहे
ते जपणं आणि तेही शेवटपर्यंत.

## पंचांग

**गुरुवार, ११ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

* मार्गशीर्ष कृष्ण सप्तमी
* नक्षत्र : पूर्वा फाल्गुनी

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४.०० सिंह


रवी उदय- ०७-०३
रवी अस्त- १८-०१

**कालाष्टमी**

## पाककृती



### हिरवे वाटाणा पराठा



★**साहित्य :-** ताजे हिरवे वाटाणे दीड कप, गव्हाचे पीठ २ कप, हिरव्या मिरच्या- २-३, चिरलेली कोथिंबीर २ चमचे, लवंगा-४, लसूण पेस्ट १ चमचा, गरम मसाला- १चमचा, चिमूटभर हळद पावडर, मीठ चवीनुसार, पीठ भिजवण्यासाठी पाणी,तेल किंवा तूप पाव वाटी .

★**कृती :-** एका रुंद भांड्यात गव्हाचे पीठ घ्या. मीठ आणि आवश्यक पाणी घालून मऊ पीठ मळून घ्या. शेवटी २ टेबलस्पून तेल टाका, थोडा वेळ मळून घ्या, झाकून ठेवा. आता एका डब्यात ताजे वाटाणे घ्या. ते प्रेशर कुकरमध्ये २ शिट्ट्या करून उकडून घ्या. शिजल्यावर त्यातील पाणी काढून टाका. पुढे कोथिंबीर, आले, लसूण आणि हिरवी मिरची मिक्सर ग्राइंडर वापरून बारीक करा. वाटताना आवश्यक असल्यास एक चमचा पाणी घाला. ते बारीक वाटून घ्या. त्यानंतर ते एका भांड्यात काढून ठेवा. त्याच मिक्सरच्या भांड्यात वाटाणे बारीक करून घ्या. एका कढईत एक टीस्पून तेल गरम करा आणि त्यात जिरे घाला. जिरे तडतडत असताना हिरवे वाटाणे आणि मसाल्याचे मिश्रण घाला. गरम मसाला, हळद पावडर घाला आणि मीठ. जास्तीचे पाणी सुकेपर्यंत ढवळत राहा. मिश्रण सुके झाले की गॅस बंद करा. मिश्रण कोमट झाले की, लिंबाच्या आकाराचे गोळे बनवा. आता पिठाचा गोळा घ्या तो वाटीसारखा बनवा. त्याच्या वाटीत वाटाण्याच्या मिश्रणाचा गोळा ठेवून हलक्या हाताने बंद करून घ्या. नंतर पोळपाटावर गव्हाचे पीठ टाकून हलक्या हाताने लाटून घ्या. तवा गरम करून थोडे तेल किंवा तूप लावून त्यावर लाटलेला पराठा दोन्ही बाजूने चांगला भाजून घ्या. गरमागरम पराठा तूप लावून खायला द्या. टेस्टी पराठा तयार.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

# भारतीय संघ मालिकेत आघाडी घेण्यासाठी सज्ज
## आज दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दुसरा टी-२० सामना



**न्यू चंदीगडमधील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर ५ टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात उद्या गुरुवारी भारत आणि दक्षिण आफ्रिका आमनेसामने येणार आहेत. मालिकेतील पहिला सामना मोठ्या फरकाने जिंकल्यामुळे भारतीय संघाचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे उद्याच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला विजय मिळवणे कठीण जाणार आहे.**

■ चंदीगड

**या** स्टेडियममधील खेळपट्टी गोलंदाज आणि फलंदाज दोघांनाही मदत करते. मैदानावरील आउटफिल्ड खूपच वेगवान आहे. ज्यामुळे फलंदाजांना खेळाच्या सुरुवातीलाच चौकार मारणे सोपे होणार आहे. तथापि, खेळ जसजसा पुढे सरकतो, तसतसे फिरकीपटूंना काही मदत मिळू लागते. या सामन्यातही दव पडण्याची शक्यता आहे, ज्यामुळे दुसऱ्या डावात गोलंदाजी करणे कठीण होईल. तथापि, पहिल्या टी-२० वर दव पडण्याचा परिणाम झाला नाही.

भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यात आतापर्यंत ३२ टी-२० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये भारतीय संघाने १९ आणि दक्षिण आफ्रिकेने १२ सामने जिंकले. एक सामना अनिर्णित राहिला. या आकडेवारीवरून, भारत दक्षिण आफ्रिकेवर वरचढ असल्याचे दिसून येते. अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल ही भारतीय सलामीवीरांची जोडी सपशेल फेल ठरली होती. मात्र भारतीय संघाला उद्याच्या सामन्यात चांगली सुरुवात करुन देण्याची जबाबदारी असणार आहे. सूर्यकुमार यादव आणि अक्षर पटेल, तिलक वर्माकडूनही मोठ्या खेळीची अपेक्षा भारतीय संघ करत आहे. हार्दिक पंड्या पुन्हा एकदा विस्फोटक फलंदाजी करण्यासाठी सज्ज झालेला आहे. अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल यांनी गेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला फक्त ७४ धावांवर गुंडाळले होते.

## हेझलवूड ॲशेसमधून बाहेर

■ ब्रिस्बेन

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या ॲशेस कसोटी मालिकेत आता उर्वरित तीन सामन्यांसाठी वेगवान गोलंदाज हेझलवूड स्नायु दुखापतीमुळे उपलब्ध होऊ शकणार नाही तर दुखापतीमुळे पहिल्या दोन कसोटीत खेळण्याची संधी न मिळालेला नियमित कर्णधार पॅट कमिन्स पुनरागमनच्या तयारीत आहे. यजमान ऑस्ट्रेलियाने पर्थ आणि ब्रिस्बेन येथील कसोटी सामने जिंकून इंग्लंडवर २-० अशी आघाडी मिळविली आहे. दरम्यान या पहिल्या दोन कसोटीत हेझलवूडचा ऑस्ट्रेलियन संघात समावेश नव्हता.

## एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत रोहित अव्वल आणि विराट द्वितीय

■ दुबई

**आयसीसीने** बुधवारी एकदिवसीय सामन्यांची साप्ताहिक क्रमवारी जाहीर केली. एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत कर्णधार रोहित शर्माने पहिले आणि विराट कोहलीने दुसरे स्थान पटकाविले. कोहलीव्यतिरिक्त के. एल. राहुललाही एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत फायदा झाला. राहुल २ स्थानांनी वर चढून १२ व्या स्थानावर पोहोचला. तर गोलंदाजांमध्ये कुलदीप यादवने तीन स्थानांची झेप घेऊन तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या क्विंटन डिकॉक (१३ व्या), एडन मार्करम (२५ व्या) आणि टेम्बा बावुमा (३७ व्या) यांनीही रँकिंगमध्ये प्रगती केली.

टी-२० मध्ये दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज डेवॉल्ड ब्रेविस आपल्या पहिल्याच सामन्यात शानदार अर्धशतक झळकावून आठव्या स्थानावर पोहोचला. भारताकडून गोलंदाज अक्षर पटेल, अर्शदीप सिंग आणि जसप्रीत बुमराह यांनाही टी-२० रँकिंगमध्ये फायदा झाला आहे. टेस्ट रँकिंगमध्ये ऑस्ट्रेलियाचे गोलंदाज मिचेल स्टार्क यांनी शेसच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये १८ विकेट घेतल्या. त्याने स्थानांची झेप घेऊन तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला. इंग्लंडचे हॅरी ब्रूक २ स्थानांनी खाली घसरून चौथ्या क्रमांकावर आले.

# वेस्ट इंडिज संघाला २०५ धावांवर गुंडाळले
## पहिल्या दिवसअखेर न्यूझीलंडच्या बिनबाद २४ धावा

■ वेलिंग्टन

**वेलिंग्टनमध्ये** आजपासून सुरू झालेल्या तीन कसोटी मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात मायकेल रे (३ गडी) आणि ब्लेअर टिकनर (४ गडी) यांच्या प्रभावी गोलंदाजींच्या जोरावर न्यूझीलंडने वेस्ट इंडिजचा पहिल्या डाव २०५ धावांवर गुंडाळला. दिवसअखेर न्यूझीलंडने बिनबाद २४ धावा केल्या होत्या. कर्णधार टॉम लॅथम ७ आणि डेव्हॉन कॉनवे १६ धावांवर खेळत आहे.

सामन्यात न्यूझीलंडचा कर्णधार टॉम लॅथमने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.वेस्ट इंडिजला १७



व्या षटकात पहिला धक्का बसला. ब्रँडन किंग न्यूझीलंडच्या वेगवान गोलंदाज ब्लेअर टिकनरचा बळी ठरला. पहिल्या विकेटची भागीदारी तुटताच वेस्ट इंडिजची फलंदाजी डळमळीत झाली. ब्लेअर टिकनरच्या धोकादायक गोलंदाजीमुळे न्यूझीलंडने वेस्ट इंडिजचा अर्धा संघ ५६ षटकांत १७६ धावांत पॅव्हेलियनमध्ये परतला. या काळात टिकनरने एकट्याने ४ विकेट घेतल्या. ब्लेअर टिकनर पाच विकेट घेण्याच्या अगदी जवळ दिसत होता,परंतु मैदानावर असे काही घडले. ज्यामुळे न्यूझीलंडचा संघ आणि न्यूझीलंडचे चाहते तणावात होते. वेस्ट इंडिजच्या फलंदाजीची लाईन उद्धस्त केल्यानंतर टिकनर ६७ व्या षटकात फाइन लेगवर क्षेत्ररक्षण करत होता. सीमारेषेवर चेंडू रोखण्याचा प्रयत्न करताना टिकनरला दुखापत झाली. नंतर त्याला स्ट्रेचरवर मैदानाबाहेर नेण्यात आले. न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी वेस्ट इंडिजला पहिल्या डावात २०५ धावांपर्यंत रोखण्यात यश मिळवले.

# अंकुश मोरे गौरव कबड्डी स्पर्धा १५ डिसेंबरपासून
## महिलांचे १२ व पुरुषांचे २४ संघ झुंजणार

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** पंच ,ज्येष्ठ कबड्डी संघटक अंकुश मोरे यांच्या एकसष्ठीपूर्ती निमित्त गोरेगावच्या अभिनव कला आणि क्रीडा अकॅडमीने अभिनव क्रीडा मंडळ, एकता क्रीडा मंडळ आणि स्पोटवूट यांच्या सहकार्याने येत्या १५ ते २०डिसेंबर या कालावधीत जिल्हास्तरीय सुपर लीग आणि बाद फेरी कबड्डी स्पर्धांचे आयोजन दिंडोशी, गोरेगाव (पूर्व ) येथे केले आहे. नागरी निवारा परिषद क्रमांक ८ येथील एनएनपी शाळेसमोरील प्रांगणात खेळवल्या जाणाऱ्या या स्पर्धेत महिलांचे १२ तर पुरुषाचे २४ संघ विजेतेपदासाठी झुंजणार आहेत. सायंकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत या सामान्यांची पर्वणी विभागातील कबड्डी शौकिनांना उपलब्ध होणार आहे.

कबड्डी प्रसार आणि प्रचारासाठी गेली ४० वर्षे कार्यरत असणारे आंतरराष्ट्रीय पंच, राष्ट्रीय प्रशिक्षक आणि कबड्डीसंघटक अंकुश रामचंद्र मोरे यांच्या एकसष्ठीपूर्तीनिमित्त अभिनव कला क्रीडा अकॅडमीने गोरेगाव पूर्वेत जिल्हास्तरीय पुरुष आणि महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. कोंकणच्या खेड तालुक्यातील महाळुंगे येथे अभिनव कला क्रीडा नगरी उभारून ग्रामीण भागातील क्रीडापटूंना कबड्डी आणि अन्य खेळांचे प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचे स्वप्न अंकुश मोरे यांना साकारायचे आहे. त्यासाठी कबड्डी आणि अन्य खेळाच्या चाहत्यांनी आपल्याला सहकार्य करावे आणि शुभेच्छा द्याव्यात असे आवाहन मोरेंनी केले आहे.

## मुंबई स्मॅशर्स संघाला पिकलबॉलचे विजेतेपद

■ नवी दिल्ली

**इंडियन** पिकलबॉल लीग स्पर्धेचे अजिंक्यपद मुंबई स्मॅशर्सने पटकाविताना अंतिम सामन्यात हैदराबाद रॉयल्सचा ५-१ असा पराभव केला. पहिल्या लढतीमध्ये मुंबई स्मॅशर्सचा क्यूआंग डुआँगने हैदराबाद रॉयल्सच्या तेजस गुलाटीचा १५-४ असा पराभव केला. त्यानंतर दुहेरीच्या सामन्यात डुआँग आणि रामचंदानी या जोडीने हैदराबादचा बेन नेवेल आणि दिव्यांशु यांचा १५-१० असा

# कबड्डी स्पर्धा
# डॉ.शिरोडकर,भारतमाता स्पोर्ट्स आणि मुंबई पोलीस जिमखानाची विजयी सलामी

■ मुंबई

**डॉ.शिरोडकर,** भारतमाता स्पोर्ट्स, मुंबई पोलीस जिमखाना यांनी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने १८व्या आंबेडकर सप्ताहनिमित्त आयोजित केलेल्या महिला गट कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. युनियन बँक,न्यू इंडिया इन्शुरन्स यांनी व्यावसायिक पुरुष गटाची दुसरी फेरी गाठली.ना.म.जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे सुरू झालेल्या उद्धाटनीय महिलांच्या सामन्यात परेलच्या डॉ.शिरोडकरने काळाचौकीच्या जिजामाता स्पोर्ट्सचा ६५-१७ असा धुव्वा उडवीत विजयी सलामी दिली.आक्रमक सुरूवात करीत सांघिक खेळाच्या जोरावर शिरोडकरने पूर्वार्धात ४ लोण देत ४२-०५ अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात आणखी २ लोण देत गुणांचे अर्धशतक पार करीत हा मोठा विजय मिळविला.

रुचिता पटेल हिच्या भन्नाट खेळाला या विजयाचे श्रेय



जाते.जिजामाताची अनुप्रिया बरी खेळली. महिलांचा दुसरा सामना मात्र अत्यंत चुरशीचा झाला.त्यात भारतमाता स्पोर्ट्सने ५-५ चढायाच्या खेळात एऐचंद्रोदय मंडळाला ३४-३१(८-५) असे नमवीत दुसरी फेरी गाठली.





# भारताचा फलंदाज श्रेयस अय्यर

**भारताचा प्रतिभाशाली युवा फलंदाज श्रेयस अय्यरचा जन्म ६ डिसेंबर १९९४ साली मुंबई येथे झाला. श्रेयस अय्यरचे पूर्ण नाव श्रेयस संतोष अय्यर आहे. श्रेयसचे वडील संतोष अय्यर हे मुंबईत बिजनेसमन आहेत. त्याची आई रोहिणी या गृहीणी आहेत. त्याची बहीण श्रेष्ठा अय्यर ही डान्सर आणि कोरियोग्राफर आहे. वयाच्या १० व्या वर्षी अय्यरने शिवाजी पार्क जिमखाना क्रिकेट अकादमीतून क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. तो १२ वर्षांचा असताना प्रशिक्षक त्याने प्रविण आम्रे यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्याला वयोगटातील क्रिकेटमध्ये पी शिवलकर आणि विनोद राघवन यांचे प्रशिक्षण लाभले.**




२०१४ मध्ये श्रेयसने युनाइटेड किंगडमच्या दौऱ्यावर ट्रेंट ब्रिज क्रिकेट संघाकडून तीन सामने खेळले होते. यावेळी त्याने ९९च्या सरासरीने २९७ धावा केल्या होत्या. यात त्याच्या सर्वाधिक १७१ धावांचा समावेश होता. २०१४-१५ मध्ये अय्यरने मुंबई संघाकडून प्रथम श्रेणी पदार्पण केले होते. यावेळी पदार्पणाच्या हंगामातच त्याने ५० पेक्षा जास्त सरासरीने ८०९ धावा केल्या होत्या. यासह तो हंगामातील सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. २०१५ च्या आयपीएल लिलावात अय्यरला दिल्ली डेअरडेविल्सने २.६ कोटींना विकत घेतले. यासह तो भारतीय क्रिकेट संघात न खेळताही आयपीएलमध्ये इतक्या महाग किमतीत विकला जाणारा क्रिकेटपटू ठरला. पदार्पणाच्या आयपीएल हंगामातच अय्यरने ३३.७६च्या सरासरीने ३४९ धावा केल्या होत्या. २०१६ मध्ये मुंबईकडून खेळत अय्यरने प्रथम श्रेणीत १३२१ धावा केल्या होत्या. यात त्याच्या ४ शतकांचा आणि ७ अर्धशतकांचा समावेश होता. त्यामुळे तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये एका हंगामात सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. तर रणजी ट्रॉफी हंगामात १३०० पेक्षा जास्त धावा करणारा तो दुसरा खेळाडू ठरला. देशांतर्गत क्रिकेटमधील त्याच्या उत्कृष्ठ खेळीने २०१७ मध्ये अय्यरला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पणाची संधी मिळाली. त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत संघात पर्याय म्हणून निवडण्यात आले होते. पुढे नोव्हेंबर २०१७ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध अय्यरने टी२० पदार्पण केले. त्याला यावेळी पहिल्या सामन्यात फलंदाजी मिळाली नाही. पण त्याने दुसऱ्या सामन्यात २३ धावा केल्या होत्या. श्रीलंके विरुद्ध डिसेंबर २०१७ मध्ये वनडे पदार्पण केल्यानंतर अवघ्या दुसऱ्या डावात अय्यरने ८८ धावा केल्या. २०१९ मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केले. त्याने चांगली कामगिरी करत स्वत:ला मधल्या फळीतील फलंदाज म्हणून सिद्ध केले आहे. तसेच तो आता मर्यादीत षटकांच्या मालिकांसाठी भारतीय संघाचा नियमित सदस्य बनला आहे.

# शिंदे पदाधिकाऱ्याच्या वडिलांचा मृत्यू पुण्याच्या सह्याद्री रुग्णालयाची तोडफोड

■ पुणे

**पुण्यातील** हडपसर येथील सह्याद्री रुग्णालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वैद्यकीय कक्षाचे शहरप्रमुख अजय सपकाळ यांच्या वडिलांचा शस्त्रक्रियेदरम्यान मृत्यू झाला. डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप रुग्णाच्या संतप्त नातेवाईकांनी केला. त्यामुळे संतप्त होऊन कचऱ्याचे स्टीलचे डबे आणि लोखंडी वस्तूंनी त्यांनी रुग्णालयात तोडफोड केली.यामुळे प्रवेशद्वारावर काचांचा खच पडला होता. त्यानंतर रुग्णालयाबाहेर ठिय्या मांडून जोपर्यंत सह्याद्री रुग्णालयावर कारवाई होऊन ते सील केले जात नाही तोपर्यंत येथून हलणार नसल्याची आक्रमक भूमिका घेतली.

अजय सपकाळ यांनी सांगितले की, माझ्या वडिलांवर २८ तारखेला दुपारी अल्सरची शस्त्रक्रिया केली होती. डॉक्टरांनी दोन दिवसांत रुग्ण बरा होईल असे आश्वासन दिले होते. शस्त्रक्रियेनंतर दोन दिवसांनी वडील शुद्धीवर आले आणि नातेवाईकांशी बोलले. त्यांचे व्हेंटिलेटरही काढले होते. मात्र, त्यानंतर डॉक्टरांनी नुकतेच ऑपरेशन झालेल्या रुग्णाला खुर्चीवर बसवले. यामुळे वडिलांचे २० ते २५ पैकी ६ ते ७ टाके तुटले.

# मुंबईमध्ये ५७ घरे पाडली सामंतांचे चौकशीचे आदेश

■ नागपूर

**मुंबई** उपनगर परिसरातील मागाठाणे मतदारसंघात कोणतीही पूर्वसूचना न देता महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि बिल्डरच्या संगनमताने ५७ घरे आणि दुकाने पाडल्यासंदर्भात शिंदेंचे आमदार प्रकाश सुर्वे यांनी लक्षवेधी मांडली. त्यावर मुंबई महापालिकेच्या या तोडकाम कारवाईप्रकरणी मंत्री उदय सामंत यांनी संबंधित अधिकारी आणि बिल्डरची चौकशी करण्याचा आदेश दिले.

यासंदर्भात बोलताना आमदार सुर्वे यांनी सांगितले की, माझ्या मागाठाणे मतदारसंघामध्ये शुक्ला कंपाउंड येथे ५७ घरे आणि दुकाने तोडण्यात आली. कुठल्याही प्रकारची संधी न देता अधिकाऱ्यांनी मनमानी केली. बिल्डर-अधिकाऱ्यांच्या संगनमतातून ही कारवाई झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती. त्यांनी तात्पुरती स्थगिती दिली होती. मात्र, महापालिका आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनमताने चक्क बाऊन्सर ठेवून ही कारवाई झाली.यावर मंत्री उदय सामंत यांनी योग्य दखल घेतली. आज उत्तरात त्यांना या कारवाईला स्थगिती देण्याचे आदेश दिले. या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी लावली आहे.

# मनसे-उबाठा पुण्यात निवडणुकीसाठी एकत्र?

■ पुणे

**पुणे** महानगरपालिका निवडणुकीत उबाठा आणि मनसे हे दोन्ही पक्ष पहिल्यांदाच एकत्र येणार असल्याची शक्यता आहे. १४ डिसेंबरला पुण्यात त्यांची पहिली औपचारिक बैठक पार पडणार आहे.

या दिवशी मनसेच्या पक्षकार्यालयात शहरातील दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांसाठी चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात दोन्ही पक्षांचे शहराध्यक्ष, विभाग प्रमुख, स्थानिक नेते उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे भविष्यातील युतीबाबत संकेत मिळू शकतात. आज मनसेच्या कोअर कमिटीची बैठक पार पडली. महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची निवड, प्रत्येक प्रभागाचे गणित आणि निवडणूक तयारी याबाबत चर्चा करण्यात आली. मनसे १२ डिसेंबरपासून इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारणार आहे.

# कूपर रुग्णालय 'सीसीटीव्ही' निगराणीखाली

■ मुंबई

**रुग्णांच्या** नातलगांकडून वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचार्यांना होणार्या मारहाणीला आळा घालता यावा म्हणून रुग्णालयात सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करावी. संपूर्ण रुग्णालय परिसर सीसीटीव्ही निगराणीखाली आणावे, असे निर्देश महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी येथे दिले. गगराणी यांनी आज कूपर रुग्णालयाला भेट दिली.

यावेळी सर्वसाधारण व विशेष उपचार विभाग, प्रसूतीगृह, बालरोग विभाग, शस्त्रक्रिया कक्ष, कॅथ लॅब, प्रयोगशाळा आणि औषधवाटप केंद्राची पाहणी करून विद्यमान व्यवस्थेत आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात. रुग्णांशी संवाद साधताना त्यांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन तत्काळ सुधारणात्मक कार्यवाही करावी, रुग्णालय सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम आणि कडेकोट करण्यासह अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली राबविण्याचे निर्देश दिले.

# पोर्श अपघात प्रकरणात २ पोलीस अधिकारी बडतर्फ

■ पुणे

**कल्याणीनगर** येथे १९ मे २०२४ रोजी घडलेल्या पोर्श अपघात प्रकरणात कर्तव्यात कसूर केल्याच्या आरोपावरून येरवडा ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल जगदाळे आणि सहायक पोलीस निरीक्षक विश्वनाथ तोडकरी यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले. पोलीस शिपाई अमित शिंदे व आनंदा भोसले यांच्यावरही वेतनवाढ रोखण्याची कारवाई केली.

एका अल्पवयीन तरुणाने भरधाव पोर्श कार चालवून दोन जणांचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. चौकशीत दोन्ही अधिकाऱ्यांनी अपघात प्रकरणात गंभीर त्रुटी ठेवल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कठोर कारवाई करण्यात आली आहे. पोलीस शिपाई अमित शिंदे आणि आनंदा भोसले हे घटनास्थळी गेले होते. त्यांनी अपघाताची माहिती वेळेवर कंट्रोल रूमला न कळवल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेची माहिती उशिरा मिळाली.

# रेस्टॉरंट, पब, बारची पालिकेकडून झाडाझडती

■ मुंबई

**गोव्यातील** नाईट क्लबला लागलेल्या आगीनंतर अवैध चालणाऱ्या बार रेस्टॉरंटचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. नववर्षाचे स्वागत करताना मुंबईत असा प्रकार घडू नये म्हणून महापालिकेने हॉटेल्स, रेस्टॉरंट, पब, बारची झाडाझडती सुरू केली आहे. पालिकेच्या अग्निसुरक्षेविषयक नियमांचे पालन न करणाऱ्या हॉटेल बारवर सक्त कारवाई केली जाणार आहे.

नववर्षाच्या स्वागत समारंभांच्या पार्श्वभूमीवर २२ ते २८ डिसेंबर दरम्यान मुंबई अग्निशमन दलाची 'विशेष अग्निसुरक्षा मोहीम' राबवली जाणार आहे. मुंबईत अनेक हॉटेल्स्, आस्थापना, गृहसंकुल व इमारती, समुद्र किनाऱ्यावर व अन्य ठिकाणी कार्यक्रम, स्वागत सोहळ्यांचे आयोजन करण्यात येते. तिथे नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येतात. या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून ही मोहीम राबविण्यात येणार आहे.



या मोहीम संभाव्य गर्दीच्या ७३१ ठिकाणांची तपासणी करण्यात आली. त्यातील अग्निसुरक्षेविषयक नियम न पालन करणाऱ्या १२ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली, असे मुंबई अग्निशमन दलाचे प्रमुख अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर यांनी सांगितले.

# आईच्या निधनानंतर सहाव्या दिवशी मुलाचाही दुर्दैवी मृत्यू

■ कोल्हापूर

**आईचे** निधन झाले म्हणून गावी आलेल्या मुलाचाही सहाव्या दिवशीच दुर्दैवी मृत्यू झाला. आठवड्याच्या आतच माय-लेकराच्या अशा निधनाने तेरणीकर हळहळले. ही घटना गडहिंग्लज तालुक्यातील तेरणी गावात घडली. सोमवारी बाळकाबाई जोतिबा जाधव (९१) यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांचा मुलगा करवीर (५२) हे गावी आले होते. दरम्यान शनिवारी मध्यरात्री अचानक त्यांच्या छातीत दुखू लागले. परंतु उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याआधीच रविवारी पहाटे त्यांचा मृत्यू झाला. ते मुंबईत ओळखीच्या खासगी वकिलाच्या हाताखाली अपघाती विमा सल्लागार म्हणून काम करायचे. येथील मुंबई ग्रामस्थ मंडळाचे ते सदस्य होते. करवीर यांचा गावाशी चांगला संपर्क होता. आईच्या उत्तरकार्यापूर्वीच त्यांनीही जगाचा निरोप घेतल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# ट्रॅक्टर कालव्यात कोसळला! चालकाचा मृत्यू

■ परभणी

**मानवत** तालुक्यातील नागरजवळा येथील उसाचा एक ट्रॅक्टर हेड व ट्रॉलीसह किन्होळा पाटीजवळ जायकवाडी कॅनॉलमध्ये कोसळला. या भीषण अपघातात ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात काल सायंकाळी पाचच्या सुमारास घडला.

महादेव नागोराव गोरे असे अपघातात मृत झालेल्या ट्रॅक्टर चालकाचे नाव असून तो पाथरी तालुक्यातील रेणापूर येथील रहिवासी होता. त्याचा स्वतःचा ट्रॅक्टर असून तो नागरजवळा येथील भागवत होगे यांचा ऊस घेऊन आमदापूर येथील लक्ष्मी नृसिंह या साखर कारखान्यात जात होता. या ट्रॅक्टरसोबत दोन ट्रॉली भरून ऊस असल्याने ट्रॅक्टरचे वजन वाढले होते. तो किन्होळा पाठीजवळ असलेल्या कालव्यात कोसळला. या अपघातात उसाच्या व ट्रॅक्टरच्या ओझ्याखाली दबल्याने चालकाचा मृत्यू झाला. ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत मदतीचा प्रयत्न केला. याच रस्त्यावर गेल्या आठ दिवसांत उसाने भरलेला ट्रॅक्टर पलटण्याची ही तिसरी वेळ आहे.

# वेतन रखडल्याने नागपुरात शिक्षकांचे मुंडन आंदोलन

■ नागपूर

**वेतन** रखडल्याच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करतानाच शिक्षकांनी तिरडी ठेवत आज सरकारविरोधात मुंडन आंदोलन केले. १० महिन्यांपासून शेकडो शिक्षकांचे वेतन रखडलेले आहे. न्यायालयाने स्पष्ट आदेश देऊनही प्रशासनाकडून अद्याप वेतन मंजुरीबाबत ठोस कारवाई न झाल्याचा आरोप शिक्षक संघटनांनी यावेळी केला. या निषेधार्थ सुरू असलेल्या आंदोलनाला तीन दिवस होऊनसुद्धा सरकारने दखल न घेतल्यामुळे शिक्षकांनी आज सरकार विरोधात तिरडी ठेवत मुंडन आंदोलन केले. या आंदोलनात ६३२ शिक्षकांनी भाग घेतला होता.

# मैदानातून हरवलेल्या 'दख्खन'साठी हळहळ

■ सातारा

**अनेक** बैलगाडा शर्यती जिंकलेला 'दख्खन' बैल हरवलेल्याला आज महिना झाला तरी तो सापडला नसल्याने 'दख्खन'चे मालकच नव्हे, तर राज्यासह प्रामुख्याने सातारा जिल्ह्यातील बैलगाडा मालक, शौकिनांत प्रचंड हळहळ व्यक्त होत आहे. 'दख्खन'ला शोधणाऱ्यासाठी ७५ हजारांचे बक्षीसही दख्खनच्या मालकांनी जाहीर केले आहे.

देगाव (ता. सातारा) येथील आदेश साळुंखे व एकसळ (ता. कोरेगाव) येथील रमेश बर्गे या दोघा बैलगाडा शौकिनांनी अडीच वर्षांपूर्वी खरसुंडी यात्रेतील बाजारातून सुमारे पाऊण लाखाला एक बैल घेतला होता. त्याचे त्यांनी नाव 'दख्खन' असे ठेवले. त्याला पौष्टिक आहार देत प्रचंड मेहनत घेऊन शर्यतींचा सराव दिला. दख्खन हळूहळू शर्यती जिंकू लागला. तो बैलगाडा शर्यतींचा 'दख्खन' झाला. बैलगाडा मालक आणि शौकिनांमध्ये तो एक हमखास 'विनर' म्हणून चर्चेत आला.

महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी बोरगाव (ता. तासगाव) येथील श्रीनाथ केसरी मैदान भरवले. त्यात ता. कोरेगाव येथील संजय जाधव यांच्या रुद्र या बैलासह दख्खन शर्यतीत उतरला होता. या जोडीकडे सर्वांचेच लक्ष होते. मैदानाच्या २७ व्या गटफेरीत दख्खनने रुद्रसह प्रथम क्रमांक मिळवत मोटारसायकल बक्षीस मिळवली. त्यामुळे सर्वांना आता दख्खन अंतिम फेरीत लिलया बक्षीस पटकावणार अशी अपेक्षा होती. ही विजयी फेरी जिंकल्यानंतर दख्खन व रुद्रला दावणीला बांधून मालक इतर शर्यती पाहण्यास गेले. दोन-अडीच तासाने उपांत्य फेरी सुरू होईल म्हणून ते पुन्हा दावणीकडे आले.

**नागसेन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
नों.क्र. : एम.यु.एम./एस.आर.ए./एच.एस.जी./(टि.सी.)/ १२००१/२०११
मौजे चेंबूर, ता. कुर्ला, न.भु.क्र. २१ पैकी व १८३१ जिल्हा मुंबई उपनगर, पंचशिल नगर नं. २, अमर महल, चेंबूर, मुंबई - ४०००८९.

उपरोक्त संस्थेच्या सभासदाचे निधन त्या तारखेला झाले असून त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या वारसांनी त्यांची सदनिका/गाळा तसेच भाग भांडवल आपले नावे हस्तांतरीत करण्यासाठी संस्थेकडे विहित नमुन्यात अर्ज केले आहेत. सदरहू मृत सभासदानी नामनिर्देशित केलेले नाही.

| मयत सभासदाचे नाव | मृत्युची तारीख | सदनिका नं | वारसाशी नाते | वारसाचे नांव |
| --- | --- | --- | --- | --- |
| कै. इंदुबाई सर्जेराव साबळे | ०३.०३.२०२३ | १४१० | भाचा | श्री. संतोष किसन रोटे |

संस्था या नोटीसव्दारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्या कडुन हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १४ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हीतसंबंध यांच्या हस्तांतरणावावत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर असा कोणत्याही हक्क मागण्या/हरकती आल्या तर त्यावाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे सोमवार - बुधवार ७ संध्या ते ९ या वेळेत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण - चेंबूर, मुंबई
दिनांक - ११.१२.२०२५
नागसेन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
सचिव

**जाहीर सूचना**

श्री. मच्छिंद्र बालाजी शिंदे हे जय हनुमान एस.आर.ए. को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, पत्ता- जागृती नगर, न्यू मानेकलाल कंपाउंड, एस.एन. मेहता रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई - ४०००८६ चे सदस्य आणि सोसायटीच्या इमारत क्र.ए मध्ये फ्लॅट क्र.५०९ चे धारक, यांचे ११.०९.२०१७ रोजी कोणतेही नामांकन न करता निधन झाले.
सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १४ दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुरावाच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. जर वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटींच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी रात्रौ.९.०० ते रात्रौ १०.३० दरम्यान उपलब्ध आहेत.

**जय हनुमान एस.आर.ए.को-ऑप. हौ.सो.लि च्या वतीने व करिता मा.सचिव**

ठिकाणः मुंबई
दिनांक: ११.१२.२०२५

# ई-वाहनांकडून टोलवसुली नको विधानसभा अध्यक्षांचे निर्देश

■ नागपूर

**इलेक्ट्रिक** वाहनांकडून टोल वसूल केला जाऊ नये असे बजावतानाच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या वाहनांकडून टोल घेतला गेला असल्यास ती रक्कम वाहनचालकांना तत्काळ परत करण्यात यावी, असे निर्देश आज सरकारला दिले.

सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान आ. अनिल पाटील, आ. शंकर जगताप आणि आ. राहुल कुल यांनी हा मुद्दा उपस्थित करत मुंबई- पुणे एक्सप्रेस वे, समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू आदी मार्गांवर महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन नियम २०२५ नुसार पूर्ण टोलमाफी जाहीर असतानाही आजपर्यंत टोल वसूल केला जात असल्याचा मुद्दा मांडला. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही टोलनाक्यांवर तत्काळ अंमलबजावणी न झाल्याचे मान्यही केले. यावेळी हस्तक्षेप करत नार्वेकरांनी अधिसूचना तर अंमलबजावणी व्हायलाच हवी, असे सांगितले.

# शिखर परिषदेत 'अश्वगंधा' उपचार पद्धतीवर चर्चा होणार

■ मुंबई

**होमिओपॅथीच्या** क्षेत्रातील वैज्ञानिक अभ्यासकांना प्रोत्साहन देण्यासाठी येत्या १७ ते १९ दरम्यान दिल्ली येथे दुसऱ्या जागतिक आरोग्य संघटनेच्या पारंपरिक औषध शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या शिखर परिषदेत 'अश्वगंधा' उपचार पद्धतीवर दीर्घ चर्चा करण्यात येणार असल्याचे खारघर होमिओपॅथीच्या संशोधन संस्थांचे अधिकारी डॉ. ब्रिजेश सिंह रावत आणि डॉ. तेजस्वी पाटोळे यांनी सांगितले. मंगळवारी पत्रकार संघात त्यांनी होमिओपॅथीच्या शिखर परिषदेची माहिती दिली.परिषदेत १०० देशातील संस्था सहभागी होणार आहेत. यावेळी पदीर्घकालीन मार्गदर्शक कृती आराखडा तयार केला जाणार आहे.

**जाहीर सूचना**

हि सूचना दूवारे कळविण्यात येते कि **शरद मनोहर करगुटकर** (मृत्यू तारीख २९/०४/२०२२) हा मेघा विद्याधर भगत यांचा भाऊ असून तो रुम नं.२४, आनंद नगर सॉल्ट पेन रोड, शंकर मंदिर जवळ अँटॉप हिल रोड वडाळा (पूर्व) मुंबई-४०००३७. महाराष्ट्र येथे वास्तव्यास होता. मी मेघा विद्याधर भगत ह्यांनी तिच्या भावाच्या मृत्यू दाखल्यासाठी तहसीलदार कार्यालय, ओल्ड कस्टम हाऊस फोर्ट मुंबई येथे अर्ज केलेला आहे. म्हणून या संदर्भात कोणाला काही हरकत / दावे असल्यास ते या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसाच्या आत संबंधीत पुराव्यासह सादर करावेत. अन्यथा त्यांनंतर दाखल होणाऱ्या सर्व हरकती /दावे अमान्य समजले जातील.

**स्वाक्षरी /-**
**सौ. मेघा विद्याधर भगत**
**मो: ९८१९८५१४९०**
**दिनांक:१० डिसेंबर २०२५**

**रिषी लेजर लिमिटेड**
सीआयएन: L99999MH1992PLC066412
नोंद. कार्यालय: ६१२, वीणा किल्लेदार इंडस्ट्रीयल इस्टेट, १०-१४ पायस स्ट्रीट, भायखळा (प.), मुंबई - ४०० ०११.
• दूर. क्र.: (०२२) २३०७५६७७ / २३०७४५८५ • फॅक्स क्र.: (०२२) २३०८००२२
• वेबसाईट: www.rishilaser.com • ईमेल: rlcl.mumbai@rishilaser.com

**भौतिक समभाग हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी विशेष खिडकी**

आमच्या ३० ऑगस्ट, २०२५ च्या वर्तमानपत्रातील जाहिरातीच्या पुढे आणि चालू असलेल्या पत्रव्यवहाराचा एक भाग म्हणून, भागधारकांना पुन्हा एकदा कळविण्यात येते की, सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ दिनांक ०२ जुलै, २०२५ च्या अनुषंगाने, गुंतवणूकदारांना गुंतवणूक सुलभ करण्यासाठी आणि त्यांनी खरेदी केलेल्या सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूकदारांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी, भौतिक समभागांच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यास सुलभ करण्यासाठी दि. ७ जुलै २०२५ ते दि. ६ जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी विशेष खिडकी उघडण्यात आली आहे.
आधी सांगितल्याप्रमाणे, ही सुविधा फक्त अशा हस्तांतरण करारांसाठी उपलब्ध आहे जे दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केले गेले होते परंतु कागदपत्रे/प्रक्रिया/किंवा अन्यथाच्या कमतरतेमुळे फेटाळण्यात/परत करण्यात/दखल घेण्यात आले नव्हते. या कालावधीत, हस्तांतरणासाठी पुन्हा दाखल केलेल्या प्रतिभूती (आजच्या दिनांकास कंपनी/आरटीए-ॲड्रॉईट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडकडे प्रलंबित असलेल्या विनंत्या समाविष्ट) फक्त डीमॅट पद्धतीने जारी केल्या जातील. अशा हस्तांतरण-सह-डीमॅट विनंत्यांसाठी योग्य प्रक्रिया अवलंबली जाईल. संबंधित परिपत्रक आणि विशेष खिडकीच्या संदर्भात प्रसिद्ध सूचनेची प्रत कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.rishilaser.com येथे उपलब्ध आहे.
पात्र भागधारकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए) शी संपर्क साधावा म्हणजेच ॲड्रॉईट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, १७/२०, जाफरभॉय इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला मजला, मकवाना रोड, मरोळ नाका, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, किंवा अधिक मदतीसाठी investors@rishilaser.com वर कंपनीशी संपर्क साधावा. पात्र भागधारकांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या हस्तांतरण विनंत्या सर्व बाबतीत योग्यरित्या पूर्ण करून दि. ६ जानेवारी २०२६ या अंतिम तारखेपर्यंत सादर कराव्यात.

मंडळाच्या आदेशाद्वारे
**रिषी लेजर लिमिटेड** करिता
सही/-
वंदना पटेल
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: १०.१२.२०२५

रामेश्वर मीडिया

**जाहीर सूचना**

जाहीर सूचनेत असे म्हटले आहे की, बँक ऑफ बडोदाने मे.आरकेबी ग्लोबल लिमिटेड (कर्जदार कंपनी) यांना नोंदणीकृत मालमत्तेच्या गट क्र.२२, महसूल गाव झाडखैरे, तालुका वाडा, जिल्हा पालघर - ४२१३१२ (सदर मालमत्ता) वर कर्ज सुविधा मंजूर केल्या आहेत, ज्याची मालकी कर्जदार कंपनीने श्री. लक्ष्मीकांत गजानन अग्रवाल आणि श्री. ज्ञान लक्ष्मीकांत अग्रवाल यांच्याकडून घेतली आहे. दि.२९.११.२००७ रोजीची मूळ विक्री जी अ.क्र.बीव्हीडी -२-५४०९/२००७ अंतर्गत नोंदवली गेली होती, जिथे श्री. लक्ष्मीकांत गजानन अग्रवाल आणि श्री. ज्ञान लक्ष्मीकांत अग्रवाल यांनी ही मालमत्ता खरेदी केली होती, ती कुठेतरी हरवलेली आहे आणि सखोल शोध घेतल्यानंतरही ती सापडलेली नाही. कर्जदार कंपनीने २४.११.२०२५ रोजी वाडा पोलीस ठाण्यात, तालुका-वाडा, जिल्हा- पालघर येथे पोलिस तक्रार दाखल केली आहे.
कर्जदार कंपनीने बँकेच्या नावे सदर मालमत्तेचे गहाणखत तयार करण्यासाठी अ.क्र. बीव्हीडी-२-५४०९/२००७ अंतर्गत नोंदणीकृत २९.११.२००७ च्या विक्रि कराराची प्रमाणित प्रत बँकेला सादर केली आहे.
जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, अ.क्र.बीव्हीडी-२-५४०९/२००७ अंतर्गत नोंदणीकृत २९.११.२००७ रोजीचा विक्री करार कोणत्याही अनधिकृत व्यक्तीकडे आढळल्यास तो वैध राहणार नाही.
शिवाय, सदर मालमत्तेत किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये विक्री, भेटवस्तू, भाडेपट्टा, वारसा, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, धारणाधिकार, ट्रस्ट, ताबा, सुविधा, जप्ती किंवा इतर कोणत्याही प्रकारे हितसंबंध असल्याचा दावा करणाऱ्या सर्व व्यक्तींनी, दिनांक २९.११.२००७ रोजीच्या अ.क्र.बीव्हीडी-२-५४०९/२००७ अंतर्गत नोंदणीकृत विक्रीपत्राच्या आधारे, याद्वारे या तारखेपासून १० दिवसांच्या आत खालील नामित व्यक्तीकडे याची माहिती देणे आवश्यक आहे, अन्यथा, बँकेचा गहाणखत म्हणून अधिकार वैध आणि अंमलात आणता येणार नाही.

**सुचारीता पात्रा**
**वकील**
**९३२२९२७३४५**

# आरजे महवश करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण

**सोशल** मीडियावर इनफ्ल्युएन्सर आणि क्रिकेटपटू युजवेंद्र चहलची गर्लफ्रेंड म्हणून ओळखली जाणारी आरजे महवश आता बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्याच्या तयारीत आहे. 'टेढी है पर मेरी है' हा चित्रपट तिच्या करिअरची पहिली मोठी पायरी ठरणार आहे. नुकतीच या चित्रपटाची घोषणा एका खास अनाउन्समेंट व्हिडिओद्वारे करण्यात आली आहे. कोरिओग्राफर रेमो डिसूजा हा चित्रपट सादर करणार असल्याने प्रेक्षकांमध्ये त्याविषयी विशेष उत्सुकता दिसून येत आहे.



अभिनेता जितेंद्र कुमार या चित्रपटातील प्रमुख भूमिका साकारणार असून तो गुलाब हकीम या व्यक्तिरेखेत दिसेल, तर आरजे महवश नगमा नामक व्यक्तिरेखा साकारणार आहे. चित्रपटाची घोषणा करण्यासाठी लाँच केलेल्या व्हिडिओमध्ये महवशची झलक नाहीये; पण रेमो डिसूजाने हा व्हिडिओ शेअर करताना लिहिलेल्या छोटेखानी टिपणात गुलाब आणि नगमामधील प्रेमाची गुंतागुंत आणि त्या नात्यात दडलेली जिद्द, हट्ट, गोडवे, तसेच धडधडणाऱ्या हृदयांमागील भावनिक आवेग अधोरेखित केलेला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन जयेश प्रधान करणार असून राष्ट्रीय पुरस्कार विजेते इस्माइल दरबार यांचे संगीत असणार आहे. हा चित्रपट रोमॅण्टिक-कॉमेडी प्रकारातला असून महवशच्या पदार्पणासोबतच जितेंद्र कुमारचा सहज नैसर्गिक अभिनय पुन्हा एकदा पडद्यावर दिसणार आहे. 'पंचायत' या मालिकेतील साधेपणामुळे जितेंद्र लोकप्रिय ठरला आहे. आता महवशसोबतची त्याची ऑनस्क्रिन केमिस्ट्री प्रेक्षक कितपत डोक्यावर घेतात हे पहायचे !

# 'किंग' खान देतोय लेकीला प्रशिक्षण

**बॉलिवूडमध्ये** पुढील काही महिन्यांत प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांमध्ये शाहरुख खानच्या 'किंग'ची चर्चा मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे. स्वतः शाहरुखही या प्रोजेक्टला स्वतःच्या कारकिर्दीतील विशिष्ट टप्पा मानत आहे. या चित्रपटाची सर्वात रोचक बाजू म्हणजे सुहाना खानचा महत्त्वाचा सहभाग. 'द आर्चीज' मधील पदार्पणानंतर सुहाना खान आता पहिल्यांदाच एका व्यापक बॉलिवूड मेनस्ट्रीम प्रकल्पात उतरणार आहे.

हा चित्रपट अधिक दर्जेदार बनावा यासाठी शाहरुख स्वतः सुहानाला स्वतंत्र प्रशिक्षण देत असल्याचा खुलासा नुकताच एका सार्वजनिक कार्यक्रमात झाला. त्यामुळे या चित्रपटाच्या चर्चेला नवी फोडणी मिळाली.

दुबईमध्ये डॅन्यूबच्या कार्यक्रमात शाहरुख खान व फराह खान एकत्र उपस्थित राहिले. त्या कार्यक्रमातून समोर आलेल्या व्हिडिओमध्ये फराह खानने शाहरुख खानकडून सुहानासाठी चालू असलेल्या प्रशिक्षणाचा उल्लेख केला. फराह खानने बोलताना आर्यन खानच्या 'बॅडस् ऑफ बॉलिवूड'च्या कौशल्यपूर्ण निर्मितीची प्रशंसा केली आणि त्यानंतर सुहाना खानच्या कामाबद्दल विशेष टिप्पणी केली. सुहाना खान अत्यंत मेहनती असल्याचे फराहने सांगितले असून'किंग' मधील ॲक्शन दृश्यांसाठी चाललेल्या तयारीवर समाधान व्यक्त केले.



बॉलिवूडमध्ये ॲक्शन प्रशिक्षण, फिजिकल कंडिशनिंग आणि स्क्रीन-कमांड यांचा सम तोल राखणे तांत्रिकदृष्ट्या कठीण मानले जाते. शाहरुखने आपल्या कारकिर्दीत ॲक्शन, रोमांस, थरार, विनोद अशा सर्व अंगांचा वापर केला आहे. त्यामुळे सुहानासाठी आपला हा चतुरस्त्र पिता प्रशिक्षण देणार आहे ही एक मोठी पर्वणीच ठरणार आहे. या चित्रपटात राणी मुखर्जी, अभिषेक बच्चन, अरशद वारसी, अनिल कपूर, जॅकी श्रॉफ आणि दीपिका पदुकोण अशा कलाकारांचेही दर्शन घडणार असल्याचे सांगितले जाते. प्रत्येक कलाकाराची स्वतंत्र स्क्रीन-स्टाईल आणि अभिनयाचा ढंग चित्रपटाची उत्सुकता वाढवणारा ठरणार आहे.

बॉलिवूडमध्ये कौटुंबिक वारसा असलेल्या अनेक कलाकारांनी वेगवेगळ्या टप्प्यांतून स्वतःची ओळख शोधली आहे; मात्र सुहाना खानच्या प्रवासात शाहरुख खानचा अनुभव प्रत्यक्ष मार्गदर्शनाच्या स्वरूपात मिळत असल्याने ही तयारी अधिक काटेकोर होत आहे. बॉलिवूडमध्ये स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी सतत कठोर सराव, शिस्त आणि कामाबद्दल दीर्घकालीन दृष्टी लागते. सुहाना खान ही ती प्रक्रिया अंगीकारत असल्याचे स्पष्ट होत आहे.

# संघर्षकाळाच्या आठवणींना उजाळा

**ग्लोबल** स्तरावर स्वतःचे वेगळेपण सिद्ध केलेल्या अभिनेत्री प्रियंका चोप्राने एक अलीकडील कार्यक्रमात आपल्या करिअरच्या सुरुवातीच्या काळातील आठवणींना उजाळा दिला. त्या काळात केलेल्या कष्टांची, त्यागांची आणि अविरत धडपडीची आठवण तिला भावूक करून गेली. नवोदित अभिनेत्री म्हणून करिअर सुरू करताना समोर उभी असलेली अनिश्चितता, संधी मिळण्याचा विरळ योग आणि त्या संधीला पकडण्यासाठी होणारी जीवाची तगमग प्रियंकाने स्पष्ट शब्दांत सांगितली. त्या काळात मिळणारे प्रत्येक काम स्वीकारण्यामागे फक्त महत्त्वाकांक्षा नव्हती, तर उद्योगात टिकून राहण्याची धडपड होती. विशीतल्या त्या वयात मी फार लोभी होते, असे सांगताना त्या 'लोभा'चे स्वरूप प्रत्यक्षात सतत काम करण्याची आस असल्याचे तिने सांगितले.



प्रियंका सांगते, करिअरच्या सुरुवातीला कोणताही प्रकल्प नाकारणे ही कल्पनाच शक्य नव्हती. दररोज काम करण्याची इच्छा, संधी हुकू नये याची काळजी आणि स्पर्धेत योग्य स्थान मिळवण्याचा प्रयत्न या सगळ्यांचे मिश्रण त्या काळातील निर्णय प्रक्रियेत स्पष्ट जाणवत होते. प्रियंका म्हणाली की, त्या दिवसांत नाताळ, दिवाळी किंवा वाढदिवस अशा खासगी क्षणांचा त्याग करावा लागला. कुटुंबासोबत वेळ घालवणे शक्य झाले नाही. अगदी वडील रुग्णालयात असतानाही व्यावसायिक बांधिलकींमुळे त्यांच्याजवळ राहणे शक्य झाले नाही.

अर्थात या प्रवासाकडे पाहताना तिने कृतज्ञताही व्यक्त केली. ती म्हणाली की, अनेक वर्षांच्या सततच्या कामामुळे, थकव्याच्या पलीकडे जाऊन केलेल्या धडपडीमुळे आज काम निवडण्याची 'लग्झरी' उपलब्ध झाली आहे. कोणते प्रकल्प स्वीकारायचे, कोणत्या वेळी काम करायचे आणि कोणत्या गोष्टींपासून दूर राहायचे याचे स्वातंत्र्य आज माझ्या हातात आले आहे. त्या स्वातंत्र्याची किंमत त्यांनी तारुण्यात केलेल्या परिश्रमात असल्याचे ती सांगते. आज मला स्वतःला धन्यवाद द्यावेसे वाटतात, असेही ती प्रांजळपणाने म्हणाली.

प्रियंका सध्या दिग्दर्शक राजामौली यांच्या 'वाराणसी'साठी पूर्णतः व्यस्त आहे. अलीकडे तिचा 'हेड्स ऑफ स्टेट' हा हॉलीवूडपट प्रदर्शित झाला असून २०२६ मध्ये 'द ब्लफ' हा आणखी एक चित्रपट जागतिक स्तरावर समोर येणार आहे. भारतीय चित्रपटसृष्टी आणि आंतरराष्ट्रीय प्लॅटफॉर्म यामध्ये सहज वावर निर्माण करणाऱ्या प्रियंकाच्या यशाचे गमक तिच्या मेहनतप्रधान भूमिकेत आहे.

# अखेर नात्यावर शिक्कामोर्तब!

बॉलिवूडमध्ये नातेसंबंधांविषयी चालत असलेल्या चर्चांना कालांतराने नवे वळण मिळत असते आणि अशाच एका चर्चेला नव्याने उभारी देणारा क्षण कृतिक कंवराच्या अलीकडील सोशल मीडिया पोस्टमधून समोर आला. कृतिकने गौरव कपूरसोबतच्या नात्याचा पहिल्यांदाच अधिकृत उल्लेख करत इन्स्टाग्रामवर काही छायाचित्रांचा संच शेअर केला. या पोस्टमुळे कृतिक आणि गौरव यांच्या नात्याविषयी चाहत्यांकडून गेल्या काही महिन्यांपासून व्यक्त होणारे अंदाज स्पष्ट संकेतांमध्ये रुपांतरित झाले आहेत.



'ब्रेकफास्ट विथ....' हे कृतिक कंवराचे कॅप्शनही पुरेसे बोलके आहे. गौरव कपूरच्या 'ब्रेकफास्ट विथ चॅम्पियन्स'या लोकप्रिय शोचा संदर्भ त्या कॅप्शनमध्ये स्पष्टपणे जाणवत होता. खेळाडूंच्या मोकळ्या आणि मनमोकळ्या संवादांसाठी ओळखला जाणारा हा कार्यक्रम गौरव कपूरला क्रिकेटविश्वातील कंटेंट निर्मितीच्या क्षेत्रात वेगळे स्थान देऊन गेला आहे. त्यामुळे कृतिक कंवराने केलेल्या या सूचक उल्लेखाने अनेक चाहत्यांचे लक्ष तात्काळ त्याकडे वेधले गेले.

गेल्या काही महिन्यांपासून कृतिक आणि गौरव शांत, सुसंगत आणि खाजगी पद्धतीने आपले नाते पुढे नेत असल्याची चर्चा सुरू होती. सार्वजनिक मंचांवर किंवा सोशल मीडियावर कोणताही थेट स्वीकार न करता दोघांनीही आपली गोपनीयता जपलेली होती. मात्र या पोस्टमुळे दोघांच्या नात्याचा अधिकृत स्वीकार झाला आहे. ज्या सहजतेने दोघांनी हा क्षण सार्वजनिक केला, त्यातून त्यांच्या संबंधातील परिपक्वपणाचे दर्शन घडते. मनोरंजनविश्वातील सततच्या प्रकाशझोतांमध्ये गोपनीयता सांभाळून एखाद्या नात्यातील उबदार क्षण सार्वजनिक करण्याची ही शैली चाहत्यांना अधिक भावणारी ठरली आहे.

# दीपिकाचा डबल धमाका

अलिकडेच, बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण मॅडॉक फिल्म्सच्या ऑफिसला भेट देताना दिसली. त्यानंतर ती मॅडॉक हॉरर कॉमेडी युनिव्हर्समध्ये सामील होणार असल्याची बातमी आली. मॅडॉकने तिला एक नाही तर दोन चित्रपट ऑफर केल्याचेही समोर आले आहे. यातील पहिल्या चित्रपटात तिला शकचुनी या बंगाली भूताची भूमिका ऑफर करण्यात आली तर दुसरा चित्रपट म्हणजे विकी कौशल अभिनीत 'महावतार' हा असून यामध्ये दीपिका मुख्य नायिकेच्या भूमिकेत दिसू शकते. या चित्रपटात विकी चिरंजीवी प्रमुख भूमिकेत असून तो परशुरामाची व्यक्तिरेखा साकारणार आहे. याबाबत दीपिकाशी प्राथमिक चर्चा आधीच झाली आहे. आता दीपिकाकडून प्रतिसादाची प्रतीक्षा आहे.



# सातारा शहरात बोचरी थंडी महाबळेश्वरला मागे टाकले

तापमान १३.६ अंश सेल्सिअस

■ सातारा

**वातावरणातील** बदल आणि सततच्या गारव्यामुळे जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढू लागला आहे. रविवारी सातारा शहराचे किमान तापमान १३.६ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. सातारा शहराने तर महाबळेश्वरलाही मागे टाकले.महाबळेश्वरचे तापमान यादिवशी १४.३ अंश इतके होते. त्यामुळे महाबळेश्वरपेक्षा सातारा जास्त थंड अशी स्थिती निर्माण झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात हवामानात मोठा चढउतार सुरू आहे. कधी ढगाळ वातावरण, कधी कडक उन तर कधी वातावरणातील गारवा अशी स्थिती असते. साताऱ्यात तापमानात अचानक घट झाल्याने सकाळपासूनच हवा बोचरी झाली आहे. रात्री आणि पहाटे बाहेर काम करणाऱ्या कामगारांना थंडीपासून बचाव करण्यासाठी ठिकठिकाणी शेकोट्या पेटवाव्या लागत आहेत. शहरातील अनेक भागांत शेकोट्यांभोवती गप्पांचे फड रंगत आहेत.दिवसभरही वातावरणात गारठा कायम असल्याने नागरिकांना उबदार कपड्यांचा आधार घ्यावा लागत आहे. तापमानात झपाट्याने झालेल्या घटीमुळे आरोग्य समस्याही वाढल्या आहेत.विशेषतः लहान मुले, वृद्ध आधीपासून आजारी व्यक्तींना थंडीचा त्रास जाणवत आहे.

# ॲमेझॉन गुंतवणार ३० अब्ज डॉलर

■ मुंबई

**ॲमेझॉन** भारतातील आपल्या व्यावसायिक क्षेत्रात येत्या २०३० पर्यंत ३० अब्ज डॉलर म्हणजे ३. ४ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक करणार आहे.

ॲमेझॉन समिटमध्ये आज ही घोषणा करताना कंपनीचे वरिष्ठ पदाधिकारी अमित अग्रवाल यांनी सांगितले की,कंपनीने भारतातील आपले व्यावसायिक उद्दिष्ट निश्चित केले असून येत्या २०३० पर्यंत प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष तसेच हंगामी अशा दहा लाख अतिरिक्त नोकऱ्या निर्माण करण्याचे ठरवले आहे. भारतात ॲमेझॉन वेब सर्व्हिस मार्केटप्लेसचा विस्तार झाल्याचा दावा त्यांनी केला. आतापर्यंत कंपनीने भारतात ४० अब्ज डॉलर




गुंतवणूक केली असून आता येत्या २०३० पर्यंत सर्व व्यवसायामध्ये आणखी ३५ अब्ज डॉलर गुंतवणूक करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# लोकल चालकांची पुन्हा मागणी डयुटीचे तास नियंत्रित करा



■ मुंबई

**मुंबईतील** लोकल रेल्वे चालकांनी बराच काळ प्रलंबित असलेली ड्युटीचे तास नियंत्रित करण्याची मागणी पुन्हा एकदा केली आहे. जास्त तास ड्युटी केल्याने चालकाला थकवा येऊन प्रसंगी त्याच्या हातून मोठा अपघात होऊ शकतो. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ड्युटीचे तास नियंत्रित करणे आवश्यक आहे, असे लोकल चालकांचे म्हणणे आहे.

इंडिगो विमान कंपनीमध्ये सध्या सुरू असलेल्या गोंधळावर केंद्र सरकारने वैमानिकांच्या ड्युटीच्या तासांबाबत कडक निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर लोकल चालकाने रेल्वे प्रवाशांचा मुद्दा पुन्हा उपस्थित केला आहे. या संदर्भात रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मानत्याप्राप्त संघटनेच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले की लोकल चालकांच्या ड्युटीचे तास कमी किंवा नियंत्रित करण्याबाबतची बोलणी सध्या अगदी प्राथमिक पातळीवर आहेत. दरम्यान, ऑल इंडिया लोको रनिंग स्टाफ असोसिएशनच्या एका पदाधिकाऱ्याने यासंदर्भात केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका केली. सरकार खासगी विमान कंपन्यांच्या वैमानिकांबद्दल कडक भूमिका घेते. मात्र रेल्वे चालकांकडे दुर्लक्ष करते, असा आरोप या पदाधिकाऱ्याने केला.

# मद्यविक्री दुकानांसाठी यापुढे सोसायटीची परवानगी हवी

■ नागपूर

**किरकोळ** विदेशी मद्यविक्री आणि किरकोळ देशी मद्यविक्री दुकानांच्या बाबतीत स्थलांतरासाठी यापुढे नोंदणीकृत सोसायटीची 'ना हरकत' घेणे बंधनकारक राहील आणि या निर्णयाची राज्यात सर्वत्र अंमलबजावणी केली जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली.

पिंपरी- चिंचवड येथील काळेवाडी-रहाटणी परिसरातील नियमबाह्य दारू दुकानांचे परवाने रद्द करण्याबाबत सदस्य शंकर जगताप यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.


पिंपरी चिंचवड मधील बजाज देशी दारू दुकान आणि विक्रांत वाईन्स शॉप या दोन्ही दुकानांचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. परंतु त्यातील एकाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या पुढील आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

# वाहतूक पोलिसांना बॉडी कॅमेरा लावावा लागणार

■ नागपूर

**वाहतूक** पोलीस अनेकदा चुकीच्या पद्धतीने चलन तयार करून वाहनचालकांना लुटतात. तर अनेकजण वाहतूक नियम तोडून पोलिसांच्या हातावर चिरीमिरी ठेवून सुटतात असा आरोप आहे. आता यापुढे असे प्रकार घडू शकणार नाहीत. कारण आता वाहतूक पोलिसांना ई-चलनची कारवाई करताना बॉडी कॅमेरा लावावा लागणार आहे.

गोव्यात वाहतुकीचे नियम मोडल्यानंतर वाहनचालकावर कारवाई करत असताना वाहतूक पोलिसाकडे बॉडी कॅमेरा असणे आवश्यक असल्याचा नियम करण्यात आलेला आहे. बॉडी कॅमेरा नसेल तर वाहतूक पोलिसाला ई-चलनची कारवाई करता येणार नाही. महाराष्ट्रातही काही प्रमुख शहरात टप्प्याटप्प्याने हाच नियम करण्यात येणार आहे,



अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत बोलत असताना केली. आमदार सुनील शिंदे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे विधानपरिषदेत विचारले की, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास वाहन चालकांवर कारवाई केली जाते. वाहतूक पोलीस अधिकारी आणि अंमलदार ई-चलनची कारवाई करतात. मात्र ही कारवाई करत असताना काही अधिकारी खासगी मोबाईल फोनचा वापर करत आहेत. स्वतः च्या सोयीनुसार ई-चलन प्रणालीमध्ये अपलोड करतात आणि चुकीच्या पद्धतीने चलन तयार करीत आहेत. यातून वाहनचालकांची लूट होत आहे. या प्रश्नाचे उत्तर देत असताना फडणवीस यांनी बॉडी कॅमेऱ्याचा वापर करणार असल्याचे सांगितले.

# उपजिल्हा अधिकारी कार्यालयाची मागणी झोपडी पात्र-अपात्र पडताळणीचे अधिकार द्या

■ मुंबई

**उपनगरातील** शासनाच्या भूखंडावरील अतिक्रमणे तोडण्याचे अधिकार उपजिल्हा अधिकारी कार्यालयांना देण्यात आले आहेत. याच धर्थीवर झोपडपट्ट्यांची पात्रता व अपात्रता निश्चिती करण्याचे अधिकार देण्यात यावेत, अशी मागणी शासनाकडे संबंधित कार्यालयाने केली आहे.

वांद्रे व अंधेरी या उपजिल्हा अधिकारी कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार बेकायदा झोपड्या तोडण्यापासून ते झोपड्यांची पात्रता निश्चितीचे अधिकार उपजिल्हा निष्कासन कार्यालयाला पूर्वीपासून होते. मात्र शासनाने झोपड्या पात्र व अपात्र निश्चितीचे अधिकार आमच्या कार्यालयाकडून काढून घेतले आहेत. हे अधिकार पुन्हा आम्हाला देण्यात यावेत, अशी मागणी २०२१ ला पत्राद्वारे शासनाकडे करण्यात आली आहे. चार वर्षे होत आली आमच्या पत्राला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहेत, अशी खंत व्यक्त करून कर्मचारी म्हणाले, बेकायदा झोपड्यांवर आम्ही तोडक कारवाई करू शकतो, अशी शासनाला खात्री वाटते. मग झोपड्यांच्या पात्र-अपात्र पडताळणीचे काम आमच्याकडून का हिरावून घेण्यात आले आहे?

# आमदार शरद सोनवणे बिबट्याच्या वेषात आले

■ नागपूर

**बिबट्यांमुळे** निर्माण झालेल्या परिस्थितीकडे लक्ष वेधून घेण्यासाठी जुन्नरचे शिंदे गटाचे आमदार शरद सोनवणे बिबट्याचा वेष परिधान करून विधिमंडळात दाखल झाले.एकट्या जुन्नर तालुक्यात मागील तीन महिन्यांत ५५ लोकांचा बिबट्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती देत बिबट्यांचे हल्ले ही समस्या राज्य आपत्ती म्हणून जाहीर करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.



याप्रसंगी माध्यमांशी संवाद साधताना सोनावणे म्हणाले की, बिबट्या हा मुद्दा राज्यात गंभीर समस्या होऊ शकतो,असा इशारा मी २०१४ मध्ये दिला होता.मात्र शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले.आता ही समस्या गंभीर होत आहे. राज्यात जवळपास १० हजार बिबटे आहेत. वनमंत्री आणि सरकारला विनंती आहे की,तीन महिन्यात नर आणि मादीसाठी वेगवेगळे असे २ हजार बिबट्यांचे सेंटर तयार करा. अधिवेशन संपण्यापूर्वी जुन्नर आणि अहिल्यानगरमध्ये २ रेस्क्यू सेंटर उभारावे. बिबट्यांची नसबंदी आणि मृतांच्या कुटुंबांना २५ लाखांची मदत देण्यापेक्षा शासनाने जीव वाचवण्याला प्राधान्य दिले पाहिजे.

# तृणमूल नेत्या विरुद्धच्या प्रमुख साक्षीदाराचा मुलगा अपघातात ठार

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या संदेशखली येथे २०२४ मध्ये अंमलबजावणी संचालनालयाच्या अधिकाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी तुरुंगात असलेले तृणमूल काँग्रेसचे निलंबित प्रमुख शाहजहान शेखविरुद्धच्या प्रमुख साक्षीदाराचा मुलगा आज न्यायालयात जाताना अपघातात ठार झाला. तर साक्षीदार जखमी झाला आहे.

बोयारमारीजवळील बसंती महामार्गावर झालेल्या या अपघातात साक्षीदार भोला घोष आणि त्यांच्या मुलाला न्यायालयात घेऊन जाणाऱ्या खाजगी कार आणि एका रिकाम्या ट्रकची समोरासमोर धडक झाली. भोला यांचा मुलगा सत्यजित घोष आणि कारचा चालक शहानूर मोल्ला यांचा जागीच मृत्यू झाला. ते दोघे एका वेगळ्या खटल्याच्या सुनावणीसाठी बशीरहाट उपविभागीय न्यायालयात जात असताना हा अपघात झाला. हा अपघात संशयास्पद वाटत असून या अपघाताची सखोल सीबीआय चौकशी करण्याची मागणी होत आहे.

# अत्यंत दयनीय परिस्थितीमुळे जन्मदात्रीनेच ६ मुलांना विकले


चौकशी बालकल्याण समितीतर्फे सुरू

■ नाशिक

**नाशिकच्या** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील टाके देवगाव बरड्याची वाडी या गावात राहणाऱ्या एका ४५ वर्षीय महिलेने तब्बल १४ अपत्यांना जन्म दिला. मात्र या महिलेने घरची हलाखीची परिस्थिती असल्याने पैशांसाठी १४ पैकी आपली ६ मुले विकल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्हा हादरला असून, पोलीस आणि प्रशासनाने तातडीने सखोल तपास सुरू केला आहे.

महिलेने १० ऑक्टोबर २०२५ रोजी बाळाला जन्म दिला. बाळाचे वजन कमी असल्याने आरोग्य विभागाने स्थानिक आशा कर्मचाऱ्यांना तपासणीसाठी पाठवले. यावेळी महिलेने त्यांना बाळ विकल्याचे सांगितले. त्यानंतर आशा सेविकांनी या घटनेची माहिती वरिष्ठांना दिली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, पोलीस प्रशासन आणि तहसील कार्यालयाचे अधिकारी तातडीने महिलेच्या घरी पोहोचले. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील म्हणाले की, ६ मुलांच्या विक्री किंवा हस्तांतरण प्रकरणाची सखोल चौकशी बालकल्याण समितीतर्फे सुरू झाली आहे. आई-वडील आणि सर्व मुलांना घोटी पोलीस स्टेशनवर आणले असून, प्रत्येक मुलाची आणि कुटुंबाची तपासणी केली जात आहे. चौकशी अहवालानंतर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. पोलीस आणि बाल कल्याण समिती हे प्रकरण दारिद्र्य किंवा उपासमारीमुळे घडले की संघटित गुन्हा आहे, हे तपासत आहेत.

# नवाकाळ शब्दकोडे-१४५७



**आडवे शब्द –**

३. कळस असलेले घुमटाकार छत ७. आयुध, साधन ११. तांबडे चंदन १३. काम, कार्य, हेतू १४. वेगाने काम संपवणे १६. चाकू १७. वाघाची गर्जना १८. खूप, पुष्कळ १९. नवरदेव २०. जमीन २१. स्थिती, अवस्था २३. टेबल २४. लेखकाचे आश्रयदाते २६. अचानक झालेला धनलाभ, ज्योतिषातील एक योग २८. झणझणीत न्याहारी ३२. अगदी जाड कागद ३३. नम्रता, लीनता ३५. बलोपासना ३६. पंढरपूरचा यात्रेकरू ३८. मुलांचे लेंढार ४०. इंग्लंडमध्ये असलेला भारताचा मौल्यवान हिरा ४४. अस्थमा ४५. सोबती ४८. गडवा ४९. मिठाई तयार करून विकणारा ५२. सशक्त तरुण ५४. भांडण ५६. अनुशासन ५७. प्रसन्न चेहऱ्याचा ५९. हनुमानाचे वडील ६०. रेडा ६१. जेवणाची इच्छा ६२. सहजगत्या ६४. कागदाचा बारीक तुकडा ६६. आयुष्य, जिवंत ६८. नौका ७०. विपरीत काल ७१. दासी ७२. होडी ७३. म्हातारपण ७४. खास, हटके ७५. रमलेला ७७. वेळू, बांबू ७८. कळी ८२. धातूची कांब ८३. चाल, डावपेच ८४. टोचणी ८६. जमिनीची धूप रोखणारी समुद्रकाठची वनस्पती, कांदळवन ८७. वरिष्ठांना दिलेली भेटवस्तू ८९. उपहास ९१. पारंपरिक इंधन ९३. पतीचे घर ९४. रामाचा मुलगा ९६. रचना करणारा ९८. मोठा वाडा, हवेली ९९. पार्वती १००. शुक्राचार्यांचा लाडका शिष्य १०१. शेष, बाकी १०३. वायर १०४. फत्ते, विजय १०५. राजाची सभा १०६. पराक्रमाचे स्फुरण १०७. कासोटा १०८. संकटातून वाचवणारा १०९. स्वच्छंद

**उभे शब्द –**

१. सोय, व्यवस्था २. अतिशय मोठे ३. एक अप्सरा, शकुंतलेची आई ४. नौबत ५. सावळागोंधळ ६. लठ्ठ ७. अमर्याद ८. वटवृक्ष ९. गमन १०. युद्धभूमी १२. पसरलेला सुवास १४. राजाज्ञा, फर्मान १५. बछडा १६. देव २०. व्यवस्थित २२. भव्य तंबू २५. चावट २६. मेघ २७. पत्नी २९. दोनने पूर्ण भाग जाणारी संख्या ३०. बासरी ३१. आशीर्वाद, अनुग्रह ३३. तांबूल ३४. सूर्य ३७. जास्तीत जास्त ३८. धार्मिक कथा सांगणारे पुस्तक ३९. इंद्राचे शस्त्र ४१. डासांमुळे होणारा एक रोग ४२. रुधिर ४३. फलक ४५. रेसच्या घोड्यांची निगा राखणारा सेवक ४६. चारी बाजू समान व चारी कोन काटकोन असलेली आकृती ४७. लांडगा ४८. लोखंड ५०. कंडक्टर ५१. किरकोळ, सामान्य ५३. थांगपत्ता ५५. अस्थिर ५६. एक शक्तिवर्धक औषधी वनस्पती ५८. कथानकातील दुष्ट पुरुष ६१. पिशाच्च ६३. उत्पात घडवणारी सागरी लाट ६४. दफनभूमी ६५. शाईची जुनी लेखणी ६७. प्रिय व्यक्ती दूर असणे ६८. ख्रिस्ती लोकांचा सण ६९. वरी, नाचणीसारखी तृणधान्ये ७०. उगाच ७३. आधण ७६. बाळाची झोपण्याची जागा ७९. लेखी करार८०. क्वचित केव्हातरी ८१. किरकोळ, नगण्य ८२. उजळणी, अभ्यास ८३. घोडी आणि गाढव यांच्या संकरातून जन्मलेला प्राणी ८५. रोगप्रतिबंधक औषध ८८. पाण्यातील सजीव ९०. प्रिय स्त्री ९२. पुष्कळ ९५. कुस्तीगीर ९७. चांदणी ९९. काम संपवण्याचा झपाटा १००. अंगयष्टी १०१. डोके १०२. काव्य करणारा १०४. माळ •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४५६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. इच्छुक ५. कामी येणे ९. शिलान्यास १०. लक्ष्मणरेषा १२. जमीनदोस्त १३. मका १४. मलम १६. वलय १७. वनराज १९. गारवा २२. आरवसा २३. चेतक २५. वक्ता २६. अनाकलनीय २९. कटू ३०. अंबाडी ३२. बेशरम ३३. रातवा ३५. बलाकमाला ३७. अवनी ३८. लाखो ४०. नवती ४२. आबाळ ४४. पाजी ४६. टन ४७. तबेला ४९. साफसफाई ५२. परळ ५७. भारी ५८. षष्ठी ५९. मोहरी ६०. खवा ६१. चिक्कार ६३. रात ६५. मघवा ६६. अटन ६७. वासरमणी ६९. युरेनियम ७०. विटप ७१. मेहनत ७२. वक्रोक्ती ७५. कटक ७७. रंजक ७८. फेरी ८०. खर ८२. अब्रूदार ८४. पडघम ८६. शिसपेन्सिल ८७. भीक ८८. अनीन ९०. हिमांशु ९१. बडदास्त ९२. वरचेवर ९४. पाव ९६. द्युत ९७. ताप ९८. शीतल ९९. पखालपार्वती १००. अनेक

**उभे शब्द** :१. कलाकार २. इसम ३. कलम ४. प्रणव ५. काषाय ६. येथवर ७. कमीज ८. सदोदित ९. शिमगा ११. रेलचेल १२. जरासा १५. लक्ष्य १८. नवखा २०. वावडी २१. मीनार २२. आयतन २३. चेटूक २४. कपिला २६. अशनी २७. कमला २८. नीरा २९. कलाबूत ३१. बाचाबाची ३२. बेवकूफ ३४. वावटळ ३६. मासला ३९. खोपा ४१. तीन ४३. साफा ४५. जीप ४८. बेट ४९. सारी ५०. सख्य ५१. ईषत ५३. रया ५४. वाहवा ५५. जवान ५६. माचिस ५७. भारवाहक ५९. मोघम ६०. खटपट ६२. परतफेड ६३. राणीव ६४. गरे ६५. मयत ६६. अटकर ६८. सन ६९. युक्ती ७१. मेजवानी ७३. क्रोध ७४. अब्रू ७६. कनकचंपक ७९. रीघ ८०. खस ८१. रपेट ८२. अलबत ८३. दागदागिने ८५. महिरप ८६. शिशुपाल ८८. अधाशी ८९. नवल ९३. चेव ९४. वपा ९५. द्युती

## साहेबांना २५ टक्के द्यावे लागतात

पान १ वरून

रुपयांचे काम देईन. याचा अर्थ असा की तिथे अधिकाऱ्याची मनमानी चालू आहे. कोणाला काम द्यायचे हे अधिकारी त्यांना मिळणाऱ्या कमिशनवर ठरवतात. कामाची गुणवत्ता पाहिली जाते का ? कामाचे वाटप पारदर्शकपणे निविदा प्रक्रियेनुसार होते की निविदा प्रक्रिया न करताच काम वाटले जात आहे? म्हातारी मेल्याचे दुःख नाही. पण काळ सोकावतो आहे.

देशपांडे पुढे म्हणाले की, हा अधिकारी आत्मविश्वासाने सांगतो की माझ्या बढतीच्या वेळेला जो मला जास्त मदत करील त्यालाच पुढचे काम देईन. म्हणजे सिस्टममध्ये इतका भ्रष्टाचार चालू आहे की कोणाचा कोणावर अंकुश नाही. हे व्हिडिओ पोस्ट करून कोणाची बदनामी करणे हा माझा उद्देश नाही तर या विभागात पारदर्शकता यावी ही आमची प्रमुख मागणी आहे. व्हिडिओच्या शेवटी दिसते की, बाहेर बसलेला शिपाई विचारतो की, साहेब, यावेळी दिवाळी का नाही दिली? यावरून लक्षात येते की खालपासून वरपर्यंत संपूर्ण सिस्टम यात सामील आहे.

देशपांडे पुढे म्हणाले की, मला काल माहिती मिळाली की रवींद्र नाट्य मंदिरातील टॉयलेटचे काम चार वर्षांपूर्वी झाले होते आणि ते आता खराब झाले आहे. आता त्यासाठी ५० लाख रुपयांची निविदा काढली जात आहे. असे वारंवार होत आहे. त्यामुळे सिस्टममधील गंभीर भ्रष्टाचार लक्षात येतो. संपूर्ण सिस्टमची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागार्फत करणे आवश्यक आहे. त्यासाठी आम्ही आमच्याकडे असलेले सर्व व्हिडिओ पुरावे तसेच कागदपत्रे त्यांना द्यायला तयार आहोत. या प्रकरणात फक्त वरिष्ठ अधिकारीच नाहीत, तर सर्व स्तरांवरच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असल्यामुळे खालपासून वरपर्यंत प्रत्येकाची चौकशी होणे गरजेचे आहे.

## ईव्ही सक्तीच्या निर्णयाला बाईक टॅक्सी संघटनेचा विरोध

पान १ वरून

आहे. त्यामुळे पेट्रोल इंजिनवरून इलेक्ट्रिक वाहनांकडे जाण्यासाठी किमान एक वर्षाचा संक्रमण कालावधी सरकारने द्यावा,अशी आमची मागणी आहे.

बीटीएने असेही निदर्शनास आणून दिले आहे की, महाराष्ट्र इव्ही धोरण २०२१ मध्ये ही पुर्णतः ऐच्छिक , प्रोत्साहनाधारित आणि आवश्यक चार्जिंग सुविधा तसेच आर्थिक सहाय्यावर आधारित असावी,असे स्पष्टपणे नमूद केले आहे.तसेच सरकारने इलेक्ट्रिक बाईक टॅक्सीसाठी सवलत, सोयिस्कर नोंदणी प्रक्रिया आणि सर्वत्र चार्जिंग स्टेशनची हमी दिली होती.त्याची पुर्तता अद्याप झालेली नाही.अशा परिस्थितीत अचानक इव्ही सक्ती करणे अन्यायकारक आहे.

## अमित शहांचा गांधी परिवारावर आरोप

पान १ वरून

इंदिरा गांधी यांचा विजय बेकायदा ठरविला. मग पंतप्रधानांच्या विरुद्ध खटला होऊ शकत नाही, असा कायदा आणून इंदिरा गांधी यांनी स्वतःचेच संरक्षण केले. या व्होटचोरीला अनैतिक रितीने निवडणूक जिंकणे असे म्हणतात. अलिकडेच सोनिया गांधी यांच्या विरोधात न्यायालयात एक तक्रार दाखल झाली आहे.

सोनिया गांधी या भारताच्या नागरिक बनण्यापूर्वी त्यांचे नाव मतदार यादीत आले, असा आरोप आहे. या व्होटचोरीला योग्यता नाही पण मतदार बनले असे म्हणतात. व्होट चोरीवर अमित शहा यांनी पुन्हा नेहरू आणि गांधी घराण्यावर आरोप केल्याने लोकसभा सभागृहात मोठा गदारोळ झाला.

## नोटांसह गोगावले! ईडी लावा

पान १ वरून

सुनील तटकरे, अनिकेत तटकरे सतत सांगत आहेत. काहीतरी दिसते म्हणूनच ते हे सांगत आहेत. दळवी हे राज्यात सगळ्यात जास्त गुन्हे असलेले आमदार आहेत. त्यांच्यावर कंत्राटदारांवर दबाव टाकण्यापासून घरगुती हिंसाचारापर्यंत गुन्हे आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, माझ्या मतदारसंघात कुजबूज आहे की, सगळी कामे अर्धवट आहेत. कामे का अर्धवट आहेत, असे विचारले की, कंत्राटदार सांगतात की कमिशनमुळे आम्ही दबलेलो आहोत. नुसते हप्ते, कमिशन असे सगळे सुरू आहे. मी दाखवलेल्या व्हिडिओतून सगळे स्पष्ट होत आहे. माझी अशी मागणी आहे की, यांच्या बँक खात्याची चौकशी करावी. यांचा व्यवसाय काय, ते कुठून कमावतात, त्यांची लाइफस्टाईल काय आहे, याचीही चौकशी करा. व्हिडिओत माणसे दिसताहेत, कॅश दिसते आहे. हा व्हिडिओ मॉर्फ आहे, असे आता पन्नास खोके गुवाहाटी गँग म्हणेल. म्हणून मी चौकशीची मागणी करत आहे. हा पैसा आपल्या रस्त्याचा, पाण्याचा, आशा वर्करचा, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा तर नाही?

चित्रलेखा यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देताना भरत गोगावले म्हणाले की माझ्या फक्त नावात शेठ आहे. मी शेठ नाही . माझ्याकडे इतके पैसे असते तर मी मुंबईत फ्लॅट घेतला असता.

दरम्यान, उबाठा नेते अंबादास दानवे यांनी काल अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांचा नोटांच्या बंडलांसह व्हिडिओ प्रसिद्ध केल्यावर दळवी यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांच्यावर आरोप केले होते. यावर तटकरे यांनी आज उत्तर दिले. दळवी यांचा राष्ट्रभक्त असा उपरोधिक उल्लेख करत ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आरोपांची उच्चस्तरीय चौकशी करावी. जयप्रकाश नारायण, मधु दंडवते, गणपतराव देशमुख यांचा आदर्श चालवणारे अलिबागचे निरागस लोकप्रिय आमदार महेंद्र दळवी यांच्यावर दानवे यांनी केलेले बेछूट आरोप अत्यंत चुकीचे आहेत. राष्ट्रभक्तीने भारावलेल्या व्यक्तिमत्त्वावर असे आरोप करणे लोकशाहीला मारक आहे. सुसंकृत व्यक्तीवर असे नाहक आरोप का केले जातात, याचे कोडे मला उलगडले नाही. त्यामुळे या थोर व्यक्तीवर झालेल्या आरोपांची सखोल चौकशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच विधिमंडळात घोषित करावी. त्या व्हायरल व्हिडिओची सत्यता शोधून काढावी. आ. दळवी यांनी ज्या राजकीय खलनायकाचा उल्लेख केला त्याचीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय तपास यंत्रणांची मदत घेऊन उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी माझी मागणी आहे. आ. दळवी थोर विचारवंत आहेत. ज्यांच्यावर आरोप झाले आणि ज्यांनी आरोप केले त्यांनी याप्रकरणी न्यायालयात जावे. माझा न्यायालयात जाण्याचा प्रश्न येत नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माझा परिचय जुना आहे. त्यांच्याशी माझे सौहर्दाचे संबंध आहेत. मागील ४० राजकीय जीवनात मी सिद्धांतावर काम करत आलो आहे.

यावर दळवी यांनी तटकरेंना संत असे संबोधून त्यांना तितक्याच उपरोधिकपणे उत्तर दिले. आ. दळवी यांनी दानवे यांना आपल्यावर केलेल्या आरोपांबाबत ८ दिवसांत खुलासा करण्याबाबत नोटीस बजावली आहे. अन्यथा त्यांच्यावर मानहानीचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे. यावर उबाठा नेते अंबादास दानवे म्हणाले की, आ. महेंद्र दळवी यांची चौकशी झाली पाहिजे. तेच सत्य सांगतील. परंतु सरकारची चौकशी करण्याची इच्छा आहे का? शिवसेनेतून फुटलेल्या शिंदे सेनेच्या नेत्यांना भाजपा मुद्दाम बदनाम करत आहे. आतापर्यंत मंत्री संजय शिरसाट, आ. महेंद्र दळवी, आ. अर्जुन खोतकर, शहाजी बापू पाटील या शिंदेंच्याच नेत्यांच्या नोटा पकडल्या आहेत. लाल शर्ट घातलेला माणूस कोण आहे याबाबत चर्चा होते. मात्र स्पष्ट दिसणाऱ्या माणसाला काही विचारले जात नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी करावी. मी सर्व सांगतो.

## विरोधी पक्षांमध्ये ताळमेळ नाही! सत्ताधाऱ्यांचा आरोप

■ नागपूर

**राज्याच्या** विरोधी पक्षांमध्ये ताळमेळ नसल्याचा आरोप सत्ताधारी पक्षांनी केला आहे. हिवाळी अधिवेशनाच्या तीन दिवसांत पायऱ्यांवर केवळ एकदाच आंदोलन झाले. आज तिसऱ्या दिवशी विरोधकांनी आंदोलन केले नाही. विरोधी पक्षनेता नसल्याने जबाबदारी कोणी घ्यायची यावरून त्यांच्यात संभ्रम असल्याची चर्चा आहे.

दरवर्षी विधीमंडळ अधिवेशन कालावधीत विरोधक विधानभवन पायऱ्यांवर आंदोलन करतात. यावर भाजपा आ. चित्रा वाघ म्हणाल्या की, विरोधकांनी आंदोलन न करणे म्हणजे फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार प्रत्येक क्षेत्रात न्याय देत आहे. त्यामुळे कदाचित विरोधकांना पायऱ्ययांवर बसण्याची वेळ येत नाही.

## अजित पवारांसह निलेश मगर यांची चौकशी करा
### जमीन गैरव्यवहार प्रकरणी दमानिया यांची मागणी

पान ८ वरून

नव्हती. त्यावेळी तिथे पालकमंत्री गिरीश बापट होते.त्यानंतर काही काळ राष्ट्रपती राजवट होती . म्हणून त्यावेळी हा व्यवहार पूर्ण केला नाही.फक्त जमीन अडकवून ठेवली. आता त्यांची थेट सत्ता आहे, ते पुण्याचे पालकमंत्री आहेत,त्यामुळे मुलाच्या नावावर त्यांनी जमीन खरेदी केल्याचे या पेपर्सवरून दिसत आहे. दमानिया यांनी यावेळी दुय्यम निबंधकांचाही यात संबंध असल्याचा उलगडा केला. त्यांनी म्हटले की,कुठली जमीन कोण राजकारणी कशी अडकवतो हे या सगळ्यांना माहित असते. ही सर्व माहिती खारगे समितीला देणार असून आता अजित पवार यांच्यावरही चौकशीचा फोकस असला पाहिजे. वतन जमीन असा उल्लेख असलेली जमीन कोण कसे घेऊ शकतो असा सवालही त्यांनी केला. अमित शाह यांच्यावर टीका करताना त्या म्हणाल्या की त्यांना बहुधा भ्रष्टचार करणाऱ्यांना भेटायला वेळ असावा आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढणाऱ्याला भेटण्यासाठी वेळ नसावा.

दुसरीकडे निलेश मगर यांनी दमानिया यांचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले की, २०१८ मध्ये कीळ असलेले पाचलकर आणि ढमढेरे हे मदत मागण्यासाठी आले होते. तेव्हा त्यात तथ्य न आढळल्याने तो विषय तेव्हाच सोडला होता. २०२५ च्या व्यवहाराशी माझा काहीही संबंध नाही. वेळ आली तर दमानिया यांच्यावर कायदेशीर कारवाई करू असा इशारा देतानाच अजित पवार यांचा कार्यकर्ता असल्याने आपल्याला टार्गेट केले जाते आहे असेही ते म्हणाले.

## एकनाथ खडसेंना कोर्टाची चपराक
### मंत्रिपदाचा गैरवापर केल्याचा ठपका

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांना भोसरी जमीन खरेदी प्रकरणात विशेष पीएमएलए न्यायालयाने चांगलीच



चपराक लगावली. खडसे यांनी मंत्रिपदाचा गैरवापर केला असून त्यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि जावयाविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करून त्वरील खटला सुरू करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

न्या. सत्यनारायण नाविंद यांच्यासमोर आज ही सुनावणी झाली.

२०१६ साली एकनाथ खडसे महसूलमंत्री असताना त्यांच्या पत्नी मंदाकिनी आणि जावई गिरीश चौधरी यांनी भोसरी एमआयडीसीतील जमीन संयुक्तरित्या खरेदी केली होती. या जमिनीचा तेव्हाचा बाजारभाव सुमारे ३३ कोटी रुपये असताना खडसेंनी आपल्या पदाचा गैरवापर करून ती जमीन अवघ्या पावणे चार लाख रुपयांत खरेदी केली, असा आरोप आहे.

खडसेंनी हा आरोप फेटाळला असून आपल्याला या खटल्यातून दोषमुक्त करण्यासाठी अर्ज केला होता. मात्र न्यायालयाने त्यांच्यावर आरोप निश्चित करण्याचे आदेश पोलिसांना दिल्याने त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

## नागपुरात रेस्क्यू ऑपरेशन
### बिबट्या जेरबंद ! ४ जखमी

■ नागूपर

**नागपूरमध्ये** आज पारडीतील शिवनगर या दाट लोकवस्तीत बिबट्या शिरल्याने एकच गोंधळ उडाला. या बिबट्याने चार जणांना गंभीर जखमी केले. त्यानंतर वनविभागाच्या कर्मचार्यांनी तीन तासांच्या प्रयत्नानंतर त्याला पकडले. बिबट्या वर्मा कुटुंबीयांच्या घरात लपून बसला होता. सकाळी साडेपाच ते सहा वाजताच्या दरम्यान बिबट्याने या परिसरातील चार जणांना जखमी केले. या चौघांना रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर वनविभाग तसेच पोलिसांनी बिबट्या लपून बसलेल्या घराबाहेर पहारा ठेवला होता.

वन विभागाचे रेस्क्यू पथक उशिरा घटनास्थळी पोहचले. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला. पथकाने त्याला गुंगीचे इंजेक्शन मारले. निशाणा चुकल्याने ते त्याला नीट लागले नाही. त्यामुळे त्याला पकडण्यास अडचण येत होती. अखेर ११ वाजताच्या सुमारास पथकाने बिबट्याला जेरबंद केले.

## श्रमिकांना पकडून 'भिक्षेकरी' बनवले
### पारधी समाजाकडून सरकारचा निषेध

■ मुंबई

**बोरिवली** चिकूवाडीत पालिकेची साफसफाईची कामे करणाऱ्या ५५ पारधी कुटुंबांच्या झोपड्यांवर महापालिकेने कारवाई केली आहे. त्यानंतर रस्त्याचा आधार घेत राहणाऱ्या पाच श्रमिक पारध्यांना भिक्षेकरी कायद्याअंतर्गत पकडून त्याच्यावर भिकारी म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन्ही घटनांचा पीडित श्रमिक पारधी कुटुंबांनी आज निषेध करत आपल्या मागण्या सरकारसमोर मांडल्या आहेत.

जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त याबाबतचे वास्तव पीडित पारधी कुटुंबाने मांडले. पालिका आर सेंट्रल विभागाच्या तोडक कारवाईमुळे चिकूवाडी नाल्याशेजारी राहणाऱ्या पारधी समुदायातील २५ शालेय मुलांचे मोठे नुकसान झाले आहे. ही लहान मुले वयस्कर आईवडिलासोबत वणवण भटकत आहेत. कारवाईमुळे कॅन्सर पीडित ज्येष्ठ नागरिक, १ ते ७ महिन्याची आजारी मुले तसेच अपंग मुलांचे हाल होत आहेत. चिकूवाडीतील ही पारधी कुटुंबे पालिकेची नालेसफाईची काम, रस्ता सफाई, कृत्रिम तलाव बांधणी अशी कामे करून राहत होती. तसेच कांदिवली येथे दत्तानी पार्क बस स्टॉप शेजारी १५ वर्षापासून पारधी कुटुंब राहत आहेत. त्यांना पोलिसांकडून अटक करण्यात येत आहे.

थंडीच्या दिवसात पालिकेची कारवाई त्वरित थांबवा, पोलिसांद्वारा भिक्षेकरी कायद्यांतर्गत श्रमिकांची होत असलेली अटक ताबडतोब थांबवा, बेघरांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३ किलोमीटरच्या परिघात पुनर्वसन करा अशा मागण्या केल्या आहेत.

## पाणबुडी देखभालीसाठी भारत-ब्राझील नौदल करार

■ मुंबई

**ब्राझील** आणि भारतीय नौदल यांच्यात स्कॉर्पिन-क्लास पाणबुड्या आणि इतर नौदल जहाजांच्या देखभालीसाठी सामंजस्य करार झाला, अशी घोषणा केंद्र सरकारच्या शिपयार्ड माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (एमडीएल) ने केली.

हा करार भारत-ब्राझील संरक्षण सहकार्यातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या करारामुळे स्कॉर्पिन-क्लास पाणबुड्यांच्या तांत्रिक माहितीची देवाणघेवाण, देखभाल आणि औद्योगिक तंत्रज्ञान, सुट्या भागांची उपलब्धता, कर्मचारी प्रशिक्षण या क्षेत्रांत परस्पर सहकार्य वाढणार आहे. दोन्ही देशांच्या नौदलांकडे असलेल्या स्कॉर्पिन-क्लास प्लॅटफॉर्मची ऑपरेशनल उपलब्धता अधिक सक्षम करणे हे या कराराचे उद्दिष्ट आहे.

